Follow Us on Social Media
EPaper

■ मराठी दैनिक
# द ग्लोबल टाइम्स
भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

■ Register No. : RNI - MAHMAR/2012/44621

बातम्या पाहण्यासाठी बारकोड स्कॅन करा
■ www.theglobaltimes.org

पान क्र. २ अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्या दोन डंपरवर सिडकोची कारवाई
पान क्र. ५ मंगळागौर स्पर्धेतून संस्कृतीचा सोहळा व नारीशक्तीचा जागर : महापौर सुजाता पाटील
पान क्र. ६ रिक्त पदांमुळे मोखाड्याची आरोग्य व्यवस्था कोलमडली
पान क्र. ८ योगाला शिक्षण, रोजगार आणि राष्ट्र उभारणीशी जोडावे : राज्यपाल

## आजचे महत्त्वाचे अपटेडस

- मुंबई - कोलकाता राष्ट्रीय महामार्गावर गोंदियातील सौंदड येथे वाहतूक कोंडी
- डीजे आणि साऊंड सिस्टमला पुणेकरांचा विरोध
- एकनाथ खडसेंच्या वाढदिवसानिमित्त शरद पवार पोहोचले जळगावात
- सेवामुक्त अग्निवीरांना शासकीय सेवेत संधी
- नवी मुंबई - परप्रांतीय कर्मचाऱ्याची मराठी दुकानदाराला धमकी
- समृद्धी महामार्गावर नाशिकमध्ये 7 दिवस वाहतूक बंद



२८° सेल्सिअस

## पैठणीवर येणार बारकोड

सोलापूर : पैठणी म्हणजे महिलांच्या सौंदर्य खुलवणारं वस्त्रभूषण आहे, खेळ पैठणीच्या माध्यममातूनही पैठणी हा वस्त्रअलंकार घराघरात पोहोचला आहे. तसेच, सणासाठी, लग्नासमारंभासाठीही पैठणीची वेगळीच क्रेझ महिला वर्गात पाहायला मिळते. मात्र, ओरिजनल पैठणी म्हणत, सेमी पैठणी आणि डुप्लीकेट पैठणी देखील बाजारात विकली जाते. मात्र, आता याच सेमी पैठणी आणि ओरिजनल पैठणीतील फरक स्पष्ट होणार आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने त्यासाठी नवी शक्कल लढवली असून ग्राहकांना दोन्हीतील फरक समजून पैठणी खरेदीपासून त्यांची होणारी फसवणूक टळणार आहे. राज्याचे स्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी पंढरपुरातून याबाबत माहिती दिली.

ग्राहकांना खरी पैठणी ओळखता यावी यासाठी आता पैठणीवर एक बारकोड आणि लोगो बनवण्याचा प्रयत्न वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून सुरू आहे. त्यामुळे, पैठणी खरेदी करणाऱ्या ग्राहकांची फसवणूक होणार नाही, अशी माहिती राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली. आज पंढरपूर येथे विठ्ठल दर्शनासाठी आले असता सावकारे यांनी माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे देत याबाबत सांगितले. संजय सावकारे यांनी विठ्ठल मंदिरात येऊन दर्शन घेतले. यावेळी पंढरपूर मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे आणि पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### क्लिक



'परेलचा राजा'चे मोठ्या उत्साहात नुकतेच आगमन झाले.

## जरांगेंच्या मागण्यांवर तातडीने तोडगा काढा

### अभिजीत दिपके यांची सरकारकडे मागणी

छत्रपती संभाजीनगर : सरकारने विद्यार्थ्यांचे प्रश्न वेळेवर न सोडवल्यामुळे आज तरुणांवर रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे. जंतर-मंतरवर आम्हाला जसे ३५ दिवस बसवून ठेवले होते, तसा प्रकार मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत करू नका. त्यांच्याशी तात्काळ चर्चा करून मराठा आरक्षणाचा प्रश्न निकाली काढा, अशी रोखठोक मागणी कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दिपके यांनी पत्रकार परिषदेत केली. यावेळी त्यांनी लवकरच जालन्यात जाऊन मनोज जरांगे यांची वैयक्तिक भेट घेणार असल्याचे स्पष्ट केले.

*छत्रपती संभाजीनगर येथील निवासस्थानी अभिजीत दिपके यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना दिपके म्हणाले की, बॉम्बे हायकोर्टाच्या टायपिंग परीक्षेत की-बोर्ड आणि सर्वरच्या तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले होते. ही परीक्षा रद्द करून नव्याने घ्यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी लावून धरली होती. ही मागणी मान्य करत परीक्षा रद्द करण्यात आली आहे. ज्या सेंटरवर गोंधळ झाला, तिथे पुन्हा परीक्षा घेऊ नये, अशी मागणी दिपके यांनी केली.*

## झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही

# मूलभूत सुविधाही पुरविणार : मुख्यमंत्री

नागपूर : झोपडपट्टीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मालकी हक्काचे पट्टे देणारे नागपूर हे देशातील एकमेव शहर आहे. मात्र आम्ही फक्त मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर या वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा देऊन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



नागपूर शहरातील झोपडपट्टीधारकांना हक्काचे मालकी पट्टे मिळवून देऊन त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केलेले प्रयत्न आणि त्याअनुषंगाने झालेले निर्णय या संपूर्ण प्रक्रियेवर सीएफएसडी (सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट) च्या लीना बुद्धे यांनी लिहिलेल्या 'फूटप्रिंट्स ऑफ डिग्निटी : बिल्डिंग टेन्युअर राइट्स इन अर्बन स्लम्स ऑफ इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन आज 'रामगिरी' येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

नागपुरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे मिळाले याचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असल्याची भावना लेखिका लीना बुद्धे यांनी मनोगतात व्यक्त केली. झोपडपट्टीधारकांचा प्रश्न हा अतिशय जुना आहे. तो फार कोणी समजून घेतला नाही, मात्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यासाठी मदतीचा हात पुढे करून ठोस निर्णय घेतले. त्यामुळे मालकी हक्क मिळण्याचा मोठा आनंद त्या रहिवाशांना मिळू शकला. हा सारा प्रवास या पुस्तकात मांडला आहे. नागपूर शहरात १२ ते १५ हजार अशा मालकीपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. हे खूप मोठे कार्य असल्याचे लीना बुद्धे यावेळी म्हणाल्या. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, डॉ. सुहास बुद्धे, सीएफएसडीतील डॉ. बुद्धे यांचे सहकारी आणि त्यांचे आप्त उपस्थित होते.

### 'फूट प्रिंट ऑफ डिग्निटी' पुस्तक दिशादर्शक असणार

झोपडपट्टीतील रहिवाशांना मालकीपट्टे मिळणे अतिशय आवश्यक होते. ते दिल्यामुळे त्यांचे जीवन बदलल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, त्यांचा सर्वसमावेशक विकास होण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. झोपडपट्टी विकासासाठी हे पुस्तक दिशादर्शक असणार आहे. मी नागपूरचा महापौर असतानाच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. त्यामुळे पुढे आमदार म्हणूनही हा विषय लावून धरला. या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या या पुस्तकाच्या लेखिका लीना बुद्धे यांनीही हा गुंतागुंतीचा विषय अभ्यासपूर्ण मांडला. मुख्यमंत्री झाल्यानंतर मालकी पट्टे देण्याचा मी निर्णय घेतला. अनेक खासगी जागांवरही झोपडपट्ट्या वसल्या आहेत. त्यांच्या नियमितीकरणासाठीही शासनाने निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेचे या पुस्तकामुळे दस्तावेजीकरण झाले आहे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी लेखिका श्रीमती बुद्धे यांचे अभिनंदन केले.

## मराठा आरक्षणप्रश्नी चर्चेस सरकार तयार : फडणवीस

मुंबई : मराठा आरक्षणासंदर्भात कायदेशीरदृष्ट्या शक्य असलेल्या, घटनात्मकदृष्ट्या वैध आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन न करणाऱ्या मागण्यांवर चर्चा करण्यास सरकार तयार आहे. तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने चर्चेची दारे खुली ठेवली आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

*नागपुर येथे ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. फडणवीस म्हणाले, सरकारचे प्रतिनिधी आंदोलनस्थळी असून ते आंदोलकांशी चर्चा करीत आहेत. या विषयावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुरुवातीपासूनच अत्यंत संवेदनशीलतेने काम करीत आहेत. त्यामुळे चर्चेतून तोडगा काढण्याचा सरकारचा प्रयत्न राहणार आहे. ज्या मागण्या कायदेशीर असतील, संविधानाच्या अंतर्गत असतील आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे उल्लंघन करणाऱ्या नसतील, अशा सर्व मागण्यांसाठी चर्चेची दारे खुली आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.*

## महायुती सरकार संकटातील बळीराजाच्या पाठीशी : एकनाथ शिंदे

परभणी : संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने ताण दिला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत आहेत. या परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा बिकट परिस्थितीत शेतक-यांना वा-यावर न सोडता महायुती सरकार खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

परभणी शहरातील इंदिरा गांधी स्टेडीयम मैदानावर रविवारी शेतकरी व युवा संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे मेळाव्यास उपस्थित शेतकरी व युवकांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री आशिष जैस्वाल, खासदार संजय जाधव उपस्थित



एकनाथ शिंदे म्हणाले, आजच्या शेतकरी व युवा संवाद मेळाव्याला असलेली गर्दी जमवलेली किंवा भाड्याची नसून मनापासून उपस्थित असलेल्या लाडक्या बहिणी, भाऊ व शेतक-यांची गर्दी आहे. महायुती सरकारने प्रत्येकाच्या नावापुढे आईचे नाव लिहीण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. केंद्राप्रमाणे राज्याने शेतकऱ्यांना ६ हजार देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कर्जमाफी योजनेचा १२ शेतक-यांना लाभ मिळाला आहे. शेतकरी व युवकांच्या हिताच्या योजना प्राधान्याने सुरू राहतील. महायुती सरकार सदैव शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेणारे असल्याचे त्यांनी सांगितले.

### मराठा आंदोलकांची निदर्शने, काळे झेंडे

जाहीर सभेच्या ठिकाणी मराठा आरक्षण आंदोलकांनी निदर्शने केली. 'एक मराठा लाख मराठा' अशा घोषणा देत मेळावा रद्द करा अशी मागणी यावेळी कार्यकर्त्यांनी केली. घोषणाबाजी करणाऱ्या या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. सभेच्या ठिकाणी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या भाषणाला प्रारंभ झाल्यानंतर काही आंदोलनकर्त्यांनी काळे झेंडे दाखवले. मराठा आरक्षणाच्या संदर्भात या कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्यानंतर शिंदे यांनी या कार्यकर्त्यांना व्यासपीठाच्या जवळ यायला सांगितले. एकूणच आजच्या सभेवर मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या उपोषणानंतर उद्भवलेल्या परिस्थितीचे सावट दिसून आले.

### विरोधात राहून विकासकामे होत नाहीत

"उद्धव ठाकरेंच्या सहा खासदारांचा उठाव वैयक्तिक स्वार्थासाठी नाही तर परभणीच्या जनतेसाठी आहे. कारण विरोधामध्ये राहून कसल्याही प्रकारचा विकास होत नाही. हे या सर्व खासदारांना माहीत होते. म्हणून हे खासदार सत्ताधारी पक्षात मूळ शिवसेनेत आले आहेत. या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, त्याचबरोबर गृहमंत्री अमित शाह यांची देखील भेट घेतली आहे. तुमच्या पाठीमागे आम्ही सर्वजण उभे आहोत. विकास कोणत्याहीप्रकारे कमी होणार नाही, असा शब्द मी देतो", असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## मुंब्रा रेतीबंदर खाडीत तीन तरुणांचा बुडून मृत्यू



ठाणे : मुंब्रा रेतीबंदर परिसरातील खाडीत पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेण्यात आले आहेत.

आलम सय्यद (४२), रिझवान सय्यद (४२) आणि साहिल पोलंदास (३०) अशी मृतांची नावे असून, तिघेही मुंब्रा येथील ठाकूरपाडा परिसरातील रहिवासी आहेत. तिघेही रविवारी दुपारी तीनच्या सुमारास खाडीत पोहण्यासाठी उतरले होते. पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही बुडाले. घटनेची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्ष, अग्निशमन दल तसेच नारपोली आणि कळवा पोलिसांना मिळाल्यानंतर संबंधित पथके घटनास्थळी दाखल झाली. आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी शोधमोहीम राबवून तिघांना सायंकाळी ४.२० वाजताच्या सुमारास पाण्यातून बाहेर काढले. त्यांना रुग्णवाहिकेतून कळवा येथील ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून तिघांनाही मृत घोषित केले. याप्रकरणी कळवा पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

## नेपाळमध्ये पुन्हा पुराचा धोका

### भोटेकोशी नदीच्या पाणीपातळीत अचानक

काठमांडू : नेपाळमध्ये पुन्हा एकदा पुराचा धोका आहे. वरच्या बाजूला पाण्याचा प्रवाह वाढल्याचे चीनने कळवल्यानंतर हा इशारा जारी करण्यात आला. सततच्या इशाऱ्यांमुळे बाधित गावांतील रहिवासी त्रस्त झाले असून, त्यामुळे कुटुंबांना रात्रीच्या वेळीसुद्धा उंच ठिकाणी स्थलांतर करण्यात येत आहे.

नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या विनाशकारी पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, रविवारी पुन्हा पूर येण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. भोटेकोशी नदीची पाणी पातळी वाढल्यानंतर प्रशासनाने लोकांना सतर्क राहण्यास सांगितले आहे. रविवारी सकाळी मोबाईल फोनवर पुराचा इशारा पाठवण्यात आला. बचाव पथके काठमांडूला पूरग्रस्त भागांशी जोडणारा महामार्ग मोकळा करण्याच्या कामात व्यस्त आहेत. नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन संस्थेने रविवारी मृतांची संख्या ७८८ आणि बेपत्ता लोकांची संख्या २,५०२ असल्याचे सांगितले. चीनमध्ये १६ जणांचा मृत्यू झाला असून ५४६ जण बेपत्ता आहेत.

■ धादिंगमधील विध्वंसाचे दृश्य भीषण आहे. अनेक लोक आपल्या उद्ध्वस्त घरांमध्ये परतले असून, ढिगाऱ्यांमध्ये आणि चिखलात आपल्या वस्तूंचे अवशेष शोधत आहेत. घरांच्या भिंती वाहून गेल्या असून, विजेचे खांब आणि तारा चिखलात अडकल्या आहेत. काही जण चिखलात गाडलेल्या वस्तू बाहेर काढत आहेत. एका माणसाने आपल्या जिवंत कोंबड्या ट्रकपर्यंत नेल्या. एका महत्त्वाच्या वीज प्रकल्पाचेही मोठे नुकसान झाले असून, त्याचा परिणाम चार जिल्ह्यांतील २०,००० हून अधिक लोकांवर झाला आहे. अनेक पूल कोसळल्याने वाहतूक अवघड झाली आहे.

### नदीचा प्रवाह वाढला

मिळालेल्या माहितीनुसार, चीनने नदीच्या वरच्या भागात पाण्याचा प्रवाह वाढल्याचा अहवाल दिल्यानंतर हा इशारा जारी करण्यात आला. बाधित गावांमधील रहिवासी सततच्या इशाऱ्यांमुळे त्रस्त झाले आहेत. कुटुंबांना रात्रीच्या वेळीसुद्धा उंच ठिकाणी जाण्यास भाग पडत आहे. धाडिंगचे रहिवासी गोविंद श्रेष्ठ म्हणाले की, त्यांचे वडील ७२ वर्षांचे आणि आई ७० वर्षांची असून, गरजेच्या वेळी ते त्यांना स्वतः उचलून नेतात. हिमालयीन प्रदेशात एक हिमनदी फुटल्यामुळे हा पूर आला होता. शास्त्रज्ञांच्या मते, हिमनदीच्या खाली झालेल्या दरड कोसळल्यामुळे तिचा मोठा भाग कोसळला आणि त्या खडकांमुळे व वितळलेल्या पाण्यामुळे नद्यांना पूर आला.

## समुद्रात २५८ प्रवाशांना घेऊन जाणारी बोट बुडाली

नवी दिल्ली : उत्तर सायप्रसच्या किनाऱ्याजवळ एक मोठी दुर्घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. तब्बल २५८ जणांना घेऊन जाणारी एक बोट समुद्रात बुडाली आहे. ही घटना रविवारी (३० ऑगस्ट) दुपारी घडली आहे. ही घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासनाकडून युद्धपातळीवर शोधकार्य आणि बचावकार्य सुरू करण्यात आलं आहे. या घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला असून आतापर्यंत १७२ जणांना वाचवण्यास यश आलं आहे.

उत्तर सायप्रसमधील किरेनिया बंदरातून तुर्कीकडे निघालेल्या एका प्रवासी बोटीला समुद्रात प्रवास सुरू केल्यानंतर काही वेळातच अपघात झाला. किरेनियाच्या किनाऱ्यापासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर ही बोट अचानक उलटली. या घटनेचा काळजाचा थरकाप उडवणारा एक व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या संदर्भातील वृत्त रॉयटर्सच्या हवाल्याने इंडिया टुडेनी दिलं आहे.

### क्लिक



उझबेकिस्तानचे अध्यक्ष शावकत मिर्झियोयेव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'ओली दराजली दोस्तलिक' (Oliy Darajali Do'stlik) हा देशाचा सर्वोच्च सन्मान देऊन सन्मानित केले.

## बालकांच्या संविधानिक हक्कांवरील 'कलरिंग बुक'चे आदिती तटकरेंच्या हस्ते लोकार्पण

मुंबई : न्याय संस्था आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यावतीने बालकांना त्यांच्या संविधानिक हक्कांची माहिती सहज, आनंददायी पद्धतीने मिळावी, यासाठी 'प्रत्येक बालकाने जाणून घ्यावेत असे 18 मूलभूत हक्क' हे बुक तयार करण्यात आले आहे. या कलरिंग बुकचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.



*नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए), मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डंगरे, माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, अनिशा गोपी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राज्यात संविधान फेलोशिपचाही शुभारंभ करण्यात आला.*

■ बालकांच्या हक्कांची माहिती त्यांना लहान वयापासूनच व्हावी, या उद्देशाने तयार करण्यात आलेले हे कलरिंग बुक मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बुकमध्ये निवारा, पोषण, शिक्षण आणि मोफत कायदेशीर मदत यांसह बालकांच्या 18 महत्त्वपूर्ण हक्कांची माहिती देण्यात आली आहे. तसेच बालविवाह, बालमजुरी, रॅगिंग, बुलिंग आणि लैंगिक शोषण या विषयांचाही बालकांना समजेल अशा संवेदनशील पद्धतीने समावेश करण्यात आला आहे.

■ मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सदैव कटिबद्ध आहे. या प्रयत्नांना कल्पकतेतून बळ देणाऱ्या या कलरिंग बुकच्या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्कांची माहिती सहज आणि आनंददायी पद्धतीने मिळणार आहे. रंग भरताना बालकांच्या मनावर त्यांच्या हक्कांची जाणीव रुजण्यास मदत होणार असल्याचा आनंद आहे. तसेच संविधान फेलोशिपच्या माध्यमातून कायदे आणि संविधानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी संस्थेने घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण आहे.

■ कार्यक्रमादरम्यान धारावी ड्रीम प्रोजेक्ट यांच्यावतीने सादरीकरण करण्यात आले. तसेच बालकांच्या हक्कांवर तयार केलेल्या रॅप गीताचे लोकार्पण करण्यात आले.

# जलजीवन मिशनच्या कामांची अधिकारी करणार पाहाणी

- खा.सुनिल तटकरे यांच्या सूचनेनुसार १ ते १० सप्टेंबरदरम्यान गावांना भेटी
- त्रुटी निदर्शनास आणून देण्याचे आवाहन

तळाः जलजीवन मिशनअंतर्गत तळा तालुक्यात करण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या कामांची प्रत्यक्ष पाहाणी करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी गावागावांत भेटी देणार आहेत.रायगडचे खासदार सुनिल तटकरे यांच्या सूचनेनुसार १ ते १० सप्टेंबरदरम्यान ही पाहाणी करण्यात येणार असून, पंचायत समितीच्या ग्रामपंचायत विभागाने त्याबाबतचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

खा. तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तळा तालुक्यातील ग्रामीण पाणीपुरवठा विभागांतर्गत जलजीवन मिशनमधून झालेल्या कामांची प्रत्यक्ष पाहाणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार उपअभियंता पाणीपुरवठा, विस्तार अधिकारी कृषि, मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्या उपस्थितीत विविध गावांमध्ये पाहाणी करण्यात येणार आहे. जलजीवन मिशनअंतर्गत एखादे काम अपूर्ण राहिले असेल, पाणीपुरवठा सुरळीत होत नसेल अथवा पाईपलाईन, पाण्याची टाकी, नळजोडणी यांसह अन्य कामांमध्ये त्रुटी असतील, तर ग्रामस्थांनी त्या पाहाणीवेळी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

गावातील नागरिक, आजी-माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रतिष्ठित नागरिक तसेच पाणीपुरवठा समितीच्या सदस्यांनी पाहाणीवेळी उपस्थित राहून आपल्या गावातील समस्या मांडाव्यात.जलजीवन मिशनचा उद्देश प्रत्येक घरापर्यंत नियमित आणि शाश्वत पाणीपुरवठा पोहोचविणे हा आहे. त्यामुळे योजनेतील त्रुटी वेळीच निदर्शनास आणून त्यांची दुरुस्ती करून घेणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्या दोन डंपरवर कारवाई

# सिडकोच्या दक्षता पथकाची धडक

## दोन्ही डंपर जप्त, चालकांविरोधात गुन्हा दाखल

पनवेल: सिडकोच्या मोकळ्या जागांवर तसेच संपादित करण्यात आलेल्या भूखंडांवर अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्यांविरोधात सिडको प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. उलवे आणि पनवेल शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत डेब्रिज टाकताना आढळलेल्या दोन डंपरवर कारवाई करून ते जप्त करण्यात आले आहेत. संबंधित चालकांविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुंबईतील बांधकामांचा राडारोडा नवी मुंबई परिसरात दिवस-रात्र चोरून टाकण्याचे प्रकार वाढत असल्याची माहिती सिडकोच्या दक्षता विभागाला मिळाली होती. त्यानुसार सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली दक्षता, सुरक्षा, अभियांत्रिकी आणि पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने कारवाई सुरू केली.

एमएच-०३-ईजी-९९०१ क्रमांकाचा डंपर घेऊन चालक हिदायत इरशाद रसूल (५३), रा. डोंगरी, मुंबई हा शेलघर टोलनाका, उलवे येथे आढळून आला. या डंपरमधील डेब्रिज सिडकोच्या मोकळ्या जागेवर टाकण्यासाठी नेले जात असल्याचे तपासात आढळल्याने उलवे पोलिस ठाण्यात संबंधित चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. डंपर पोलिसांनी जप्त केला आहे.

तसेच, एमएच-०२-एफएक्स-९०१३ क्रमांकाच्या दुसऱ्या डंपरमधून मानवी आरोग्यास आणि पर्यावरणास धोका निर्माण करणारा डेब्रिज अनधिकृतपणे टाकला जात असल्याचे आढळले. उरण-पनवेल लिंक रोडवरील साईकृपा ढाबा परिसरात ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी डंपर चालक पठाण जावेद रसूल खान (२७), रा. मंगरूळ, ठाणे याच्याविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, डंपर जप्त करण्यात आला आहे.



सिडकोच्या मोकळ्या जागांवर अनधिकृतपणे डेब्रिज टाकून पर्यावरणाची हानी करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. बांधकाम व्यावसायिक, डंपरचालक तसेच नागरिकांनी अनधिकृतपणे डेब्रिज टाकू नये, असे आवाहन करण्यात आले

## गव्हाणमधील ९ लाखांच्या सशस्त्र दरोड्याचा छडा

### पाच आरोपी गजाआड

पनवेल: पनवेल जवळील गव्हाण गावात पहाटे घरात घुसून चाकूचा धाक दाखवत सुमारे ९ लाख रुपयांचा ऐवज लुटणाऱ्या दरोडेखोरांच्या टोळीचा उलवा पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात पाच आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून वाहनांसह सुमारे ८ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गव्हाण येथील ५३ वर्षीय महिलेच्या घरात पहाटेच्या सुमारास आरोपींनी प्रवेश केला. चाकूचा धाक दाखवत घरातील व्यक्तींना धमकावल्यानंतर सुमारे पाच तोळे सोन्याचे दागिने आणि दोन लाख रुपये रोख असा ऐवज घेऊन आरोपी पसार झाले होते. या घटनेने परिसरात खळबळ उडाली होती.

## कंपनी सेक्रेटरी परीक्षेत पनवेलचा विश्वेश सहस्रबुद्धे देशात बारावा

### पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते सत्कार

पनवेल: कंपनी सेक्रेटरी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत संपूर्ण भारतात १२वा क्रमांक पटकावणाऱ्या पनवेलचे सुपुत्र विश्वेश अविनाश सहस्रबुद्धे यांचा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या यशामुळे पनवेलच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



सत्कार सोहळ्यात पालकमंत्री भरत गोगावले यांनी विश्वेश यांच्या परिश्रम, चिकाटी आणि ध्येयवेडाचे कौतुक केले. अशा तरुणांच्या यशामुळे समाजात प्रगतीची दिशा निर्माण होते आणि राज्याच्या विकासाला नवी गती मिळते, असे त्यांनी नमूद केले. यावेळी विश्वेश यांच्या पालकांचाही विशेष सन्मान करण्यात आला. पालकांनी दिलेल्या संस्कार आणि पाठबळामुळेच विश्वेश आज या शिखरावर पोहोचला आहे, असे सांगत पालकमंत्र्यांनी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले.

# अनधिकृत आठवडा बाजारावर सिडकोची धडक

## पोलिसांच्या सहकार्याने कारवाई; रस्ते व पदपथ केले अतिक्रमणमुक्त



पनवेल: सिडकोच्या उलवे नोडमधील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधातील कारवाईनंतर आता अनधिकृत आठवडा बाजारांवरही कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. सिडकोने उलवे पोलिसांच्या सहकार्याने सेक्टर १९ मधील अनधिकृत आठवडा बाजारावर धडक कारवाई केली.

या संयुक्त कारवाईदरम्यान रस्ते आणि पदपथांवर अनधिकृतपणे व्यवसाय करणारे विक्रेते व हातगाड्या हटविण्यात आल्या. तसेच वाहतुकीस अडथळा ठरणारे साहित्यही हटविण्यात आले. त्यामुळे परिसरातील रस्ते व पदपथ नागरिकांसाठी मोकळे झाले.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या आदेशानुसार, मुख्य नियंत्रक विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियंत्रक अमित राजपूत यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. सिडकोचे अधिकारी-कर्मचारी, सुरक्षा रक्षक, उलवे पोलिस, कामगार आणि टेम्पो पथकाने संयुक्तपणे कारवाई यशस्वी केली.

उलवे नोडमधील रस्ते व पदपथ अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी यापुढेही विविध ठिकाणी अशा प्रकारच्या कारवाया सुरू राहणार असल्याचे सिडको प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांनी नियमांचे पालन करावे तसेच नागरिक व व्यावसायिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे

# प्रभाग १४ मध्ये आयुष्मान, आभा कार्ड शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## नगरसेविका कु. आर्या प्रविण जाधव यांच्या पुढाकाराने आयोजन

पनवेल: शहरातील प्रभाग क्रमांक १४ मध्ये नागरिकांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ सहज उपलब्ध व्हावा, या उद्देशाने महाविकास आघाडीच्या नगरसेविका नगरसेविका कु. आर्या प्रविण जाधव यांच्या वतीने आयुष्मान कार्ड आणि आभा कार्ड नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरादरम्यान नागरिकांना आयुष्मान भारत योजनेचे कार्ड तसेच आभा कार्ड तयार करून देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. परिसरातील पात्र नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेतला.

या शिबिराला प्रभाग क्रमांक १४ मधील सर्व नगरसेवकांनी उपस्थिती लावत उपक्रमाला पाठिंबा दिला. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित शासकीय योजनांचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा




उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमाच्या आयोजनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विभागप्रमुख प्रविण जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. नागरिकांना आवश्यक आरोग्यविषयक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी भविष्यातही विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

# डी. वाय. पाटील अभियांत्रिकी कॉम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थ्यांना १८५ हून अधिक जॉब ऑफर्स



कोल्हापूर: डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, कसबा बावडा येथील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांना विविध नामांकित राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून १८५ हून अधिक जॉब ऑफर्स प्राप्त झाल्या आहेत. हेवलेट-पॅकार्ड (एच पी ) कंपनीमध्ये दोन विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांना ८.५ लाख रुपये वार्षिक पॅकेज मिळाले आहे.

लॉन्च्ड ग्लोबल या कंपनीने सर्वाधिक ४३ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. त्याखालोखाल अनलॉक्स अकॅडमीने २०, वॉलस्टार टेक्नॉलॉजीजने १९, इन्फोसिसने १३, टेस्टयंत्रा सॉफ्टवेअर सोल्युशन्सने १०, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ९, एज्यू व्हर्सिटी बंगळुरू ८, सायबर सक्सेस ६, आणि एक्सेलआरने ५ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. हेक्सावेअर टेक्नॉलॉजीज, फोक्सवॅगन इंडिया प्रा. लि., , फॉक्स सोल्युशन्स, मायक्रोलाइज आणि पेगाससह विविध कंपन्यांनीही विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली.

विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांकडून आकर्षक पॅकेज मिळाले असून एचपीमध्ये ८.५ लाख रुपये, टीसीएसमध्ये व लॉन्च्ड ग्लोबल ७ लाख, अनलॉक्स अकॅडमीमध्ये ६ लाख, पेगासस ५.५ लाख रुपये, फॉक्स सोल्युशन्समध्ये ५.४६ लाख, ४.८ लाख, हेक्सावेअरमध्ये ४ लाख, तर इन्फोसिसमध्ये ३.६ लाख रुपये पॅकेज ऑफर केले आहे.

या निवडीसाठी अधिष्ठाता प्रा. सुदर्शन सुतार, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मकरंद काईंगडे, सीएसई विभागप्रमुख डॉ. राधिका ढणाल, प्लेसमेंट समन्वयक तसेच सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता, सी.एच.आर.ओ. श्रीलेखा साटम, प्राचार्य डॉ. संतोष चेडे आणि रजिस्ट्रार डॉ. एल. व्ही. मालदे यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ५०० वृक्षांचे दान

## नगरसेविका प्रीती जॉर्ज-म्हात्रे यांचा पर्यावरण संवर्धनासाठी स्तुत्य उपक्रम

पनवेल: पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेविका प्रीती जॉर्ज-म्हात्रे यांनी पर्यावरण संवर्धनाचा अनोखा उपक्रम राबविला. वाढदिवसाच्या पारंपरिक शुभेच्छांऐवजी सामाजिक बांधिलकी जपत 'प्रोटेक्ट ट्री फॉर ग्रीन इंडिया फाउंडेशन'च्या माध्यमातून ५०० वृक्षांचे दान करण्यात आले.

यावेळी बोलताना प्रीती जॉर्ज यांनी महापौर नितीन पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. महापौरांनी नेहमीच महिला शक्तीला प्राधान्य दिले आहे. महापालिकेच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी विविध योजना व उपक्रमांना त्यांनी मोठ्या प्रमाणात चालना दिली. त्यामुळे



लोकप्रतिनिधी म्हणून मी त्यांची ऋणी आहे, असे त्यांनी सांगितले. महापौरांनी वाढदिवसानिमित्त बुके किंवा केक देण्याऐवजी पुस्तके अथवा समाजोपयोगी वस्तू भेट देण्याचा संदेश दिला आहे. त्याच विचारातून हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आल्याचे जॉर्ज यांनी स्पष्ट केले.

'प्रोटेक्ट ट्री फॉर ग्रीन इंडिया फाउंडेशन'चे ओंकार देशमुख यांच्या सहकार्याने आदई डोंगरावर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी ५०० झाडे दान करण्यात आली. विशेष म्हणजे, ही संस्था केवळ पावसाळ्यातच नव्हे, तर उन्हाळ्यातही कावडीच्या माध्यमातून पाणी वाहून नेत डोंगरावरील झाडांचे संगोपन करण्याचे काम करते.

# वाढदिवसानिमित्त गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

पनवेल: पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन (भाई) पाटील यांचा वाढदिवस शिवसेनेतर्फे पनवेल शहरातील शिवसेना शाखेत उत्साहात साजरा करण्यात आला. महापौरांनी वाढदिवसानिमित्त अवाजवी खर्च टाळून सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत शिवसेनेच्या वतीने गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रयत्न करण्यात आला.यावेळी पनवेल रायगड जिल्हा कार्यकारिणी सल्लागार रमेश गुडेकर, उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगरप्रमुख तथा नगरसेवक ॲड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण, एकनाथ म्हात्रे, गणेश म्हात्रे, महिला तालुकाप्रमुख मंदाताई जंगले, उपमहानगरप्रमुख सचिन मोरे, उपमहानगर समन्वयक राहुल गोगटे, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, पनवेल शहर संघटक अभिजित साखरे, तळोजा शहर संघटक राहुल कदम, सुजन मुसलोंडकर, महिला उपतालुकाप्रमुख स्मिताताई भोईर, नैना सुरते, युवासेना लोकसभा अध्यक्ष पराग मोहिते, युवासेना विधानसभा संपर्कप्रमुख अभिनय सोमण, युवासेना पनवेल विधानसभा अध्यक्ष जय कुष्टे, युवासेना महानगर अध्यक्ष प्रेम ठाकूर, युवासेना पनवेल शहरप्रमुख कपिल कुरघोडे, तौफिक बागवान, गुलाब बागवान, मंदार काणे यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डी.वाय. पाटील विद्यापीठाच्या विद्यार्थिनींकडून कोडोली पोलिसांना राखी

कोल्हापूर: डी. वाय. पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे येथील विद्यार्थी कल्याण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या संयुक्त विद्यमाने राखी विथ खाकी उपक्रमांतर्गत कोडोली पोलिस ठाण्यात विद्यार्थिनींकडून रक्षाबंधन करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षकांसह सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधत कर्तव्यनिष्ठ खाकी वर्दीप्रती कृतज्ञता, सन्मान आणि बंधुभाव व्यक्त करण्यात आला.

यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन सुरेश मसुटगे यांनी विद्यार्थिनींशी मनमोकळा संवाद साधला. ते म्हणाले, शिक्षणासाठी घरापासून दूर राहणाऱ्या प्रत्येक मुलीच्या अडचणी आम्हाला समजतात. कोडोली पोलीस ठाणे हे तुमचा हक्काचा मोठा भाऊ आहे. कोणत्याही संकटाच्या किंवा




अडचणीच्या वेळी माता-भगिनींच्या संरक्षणासाठी आम्ही सदैव तत्पर राहू.

यावेळी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण विभाग संचालक अभिजित संजय शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी आशुतोष मधुकर पाटील, प्रा. पूनम खाडे, प्रा. नामदेव पाटील, प्रा. श्रावणी गिरीगोसावी आदी उपस्थित होते.

कुलपती डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, प्र-कुलपती ऋतुराज संजय पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कुलगुरू डॉ. ए. के. गुप्ता, कुलसचिव डॉ. जे. ए. खोत यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

हेटवणे येथे 'कॅप्टन तेलंगे फाउंडेशन'चा दिमाखात शुभारंभ

# शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना चालना

## स्व. माणिकराव तेलंगे यांच्या स्मृतींना उजाळा

रोहा: हेटवणे (ता. रोहा) येथे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या 'कॅप्टन तेलंगे फाउंडेशन'चा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री कु. आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने हेटवणे गावातील स्व. माणिकराव बाजीराव तेलंगे बसस्थानकाचे नूतनीकरण व सोलर लाईट पोलचे लोकार्पण, तसेच जिल्हा परिषद शाळेला शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला रोहा अष्टमी नगराध्यक्षा कु. वनश्री शेडगे, तटकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त संदीपजी तटकरे, पंचायत समिती रोहाच्या सभापती सौ. विजयाताई विनोद पाशिलकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहा तालुका कार्याध्यक्ष समीर जनार्दन शेडगे, उपसभापती संजय मांडलूस्कर, नगरसेविका सौ. नीता हजारे, राष्ट्रवादीचे युवानेते राकेश शिंदे, शिवसेना ठाकरे गटाचे रोहा शहरप्रमुख राजेश काफरे, तसेच वैभव साबळे, प्रशांत साबळे, दर्शन मोतीराम तेलंगे, सचिन जनार्दन शेडगे, अल्ताफ चोरडेकर यांच्यासह हेटवणे ग्रामस्थ, रोहा तालुक्यातील ज्येष्ठ मंडळी व जय बजरंग मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.





तटकरे-तेलंगे कुटुंबीयांच्या ऋणानुबंधांना उजाळा

यावेळी मंत्री आदिती तटकरे, नगराध्यक्षा वनश्री शेडगे व संदीपजी तटकरे यांनी मनोगत व्यक्त करताना तटकरे व तेलंगे कुटुंबीयांमधील अनेक वर्षांच्या जिव्हाळ्याच्या नात्याला उजाळा दिला. स्वर्गीय माणिकराव बाजीराव तेलंगे यांच्या सामाजिक योगदानाच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी अशा सामाजिक संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

फाउंडेशनचे संस्थापक कॅप्टन प्रसाद तेलंगे यांनी आपल्या तब्बल २० वर्षांच्या समुद्रातील कार्यप्रवासाविषयी माहिती देताना, या अनुभवातून समाजासाठी काहीतरी देण्याच्या भावनेतून कॅप्टन तेलंगे फाउंडेशनची स्थापना केल्याचे सांगितले. फाउंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात येत असून, भविष्यातही गरजू विद्यार्थ्यांना व समाजातील विविध घटकांना मदतीचा हात देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कॅप्टन प्रसाद तेलंगे, सौ. चैत्राली प्रसाद तेलंगे, अजित तेलंगे, सौ. विभावरी अजित तेलंगे, सौ. कुसुम सोनवणे, अरुणेश चोरगे, आदित्य कोंढाळकर, विजय काते, आकाश तेलंगे, प्रणित तेलंगे, हरी तेलंगे, ओम तेलंगे, वैभव तेलंगे, अंकुश तेलंगे, सचिन कुर्ले, साविओ फर्नांडिस आणि अभिषेक निकम यांनी विशेष परिश्रम घेतले.

हेटवणे येथे सामाजिक बांधिलकीची नवी दिशा देणाऱ्या 'कॅप्टन तेलंगे फाउंडेशन'च्या स्थापनेचे ग्रामस्थ व मान्यवरांनी स्वागत केले.

### युवा गुणवंतांचा गौरव

**रायगड जिल्ह्यातील पहिली महिला नाविक कॅडेट तन्वी मिलिंद लहाने तसेच इस्रो परीक्षेत प्रावीण्य मिळविल्याबद्दल विहान अजित तेलंगे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आणि युवकांना शिक्षण, कौशल्य व विविध क्षेत्रांत प्रोत्साहन देण्याचा फाउंडेशनचा प्रयत्न असल्याचे यावेळी सांगण्यात आले.**

# श्री बल्लाळेश्वर देवस्थान व रुधिरसेतू यांच्या विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर

## ७५ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



पालीः श्री बल्लाळेश्वर देवस्थान-पाली व रुधिरसेतू सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला नागरिकांचा आणि भाविकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. रविवारी, ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत भक्त निवास क्रमांक २ येथे या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमात एकूण ७५ जणांनी उत्साहाने रक्तदान केले.

सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने या भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ वाजता शिबिराचा प्रारंभ झाला. पाली परिसरातील ग्रामस्थ, युवक तसेच बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या अनेक भाविकांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान केले.

रक्तदानासारख्या श्रेष्ठ दानामध्ये सर्वांनी दाखवलेला हा उत्साह कौतुकास्पद असल्याचे मत आयोजकांनी व्यक्त केले. तसेच, शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी देवस्थानचे विश्वस्त, रुधिरसेतू सेवा संस्थेचे सदस्य आणि वैद्यकीय पथकाने विशेष परिश्रम घेतले. रक्तदान करणाऱ्या सर्व ७५ रक्तदात्यांचे आयोजकांतर्फे विशेष आभार मानण्यात आले. यावेळी श्री बल्लाळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष वैभव आपटे, व्यवस्थापक शेखर सोमण यांनी शिबिरास भेट दिली. तर डॉक्टर्स, कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# ‘एक देश, एक निवडणूक’साठी भाजपकडून मोर्चेबांधणी

## निवृत्त न्यायमूर्ती, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञांच्या चर्चेत समर्थनाचा ठराव

**मुंबई : केंद्र सरकारच्या ‘एक देश, एक निवडणूक’ या संकल्पनेला राज्यात व्यापक जनसमर्थन मिळविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. भाजपच्या पुढाकाराने मुंबईत रविवारी पार पडलेल्या एका चर्चासत्रात विधी, शिक्षण आणि अर्थ क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणून या संकल्पनेच्या समर्थनार्थ ठराव मंजूर करण्यात आला.**




भाजप नेते आणि कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पुढाकाराने ज्युरिस्ट्स फॉर जस्टिस फाऊंडेशनच्या वतीने याचे आयोजन करण्यात आले होते. एक देश एक निवडणूकसाठी आग्रही असलेल्या केंद्र सरकारच्या वतीने देशभर वातावरणनिर्मिती केली जात आहे. दिल्लीच्या या हालचालींना मुंबईतून पाठबळ मिळविण्याकरिता विविध क्षेत्रातील दिग्गजांना एकाच मंचावर आणून चर्चा घडविली गेली.

वारंवार होणाऱ्या निवडणुकांमुळे प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि सरकारी यंत्रणेवर ताण येतो, तसेच विकासकामांवर परिणाम होतो, असा युक्तिवाद यावेळी करण्यात आला. माजी न्यायमूर्ती बी. पी. देशपांडे, माजी जिल्हा न्यायाधीश मीराताई खडक्कर, ज्येष्ठ अधिवक्ता आणि भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह, अविनाश धर्माधिकारी, चार्टर्ड अकाउंटंट रवी पानी, अधिवक्ता प्रा. दीपक परमार, माजी प्रधान जिल्हा न्यायाधीश नागेश व्ही. न्हवकर आणि माजी जिल्हा न्यायाधीश चंदा नथानी यांनी या प्रस्तावाच्या विविध पैलूंवर मते मांडली.

निवडणुका एकाचवेळी झाल्यास निवडणूक खर्च कमी होण्यासोबतच सरकारी यंत्रणा वारंवार निवडणूक प्रक्रियेत गुंतून राहणार नाही, असा दावा चर्चेत करण्यात आला. पोलीस दलावरील अतिरिक्त ताणाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. घटनात्मक आणि न्यायालयीन अडचणींबरोबरच आर्थिक परिणामांचाही ऊहापोह करण्यात आला.

मंत्री लोढा यांनी या प्रस्तावाचे समर्थन करताना म्हटले की, ‘एक देश, एक निवडणूक’मुळे सरकारची कार्यक्षमता वाढेल आणि विकासाला चालना मिळेल. भारतासारख्या मोठ्या लोकशाही देशात वारंवार निवडणुका घेण्यापेक्षा निवडणूक प्रक्रिया एकत्रित करण्याचा प्रस्ताव देशहिताचा आहे.

चर्चेदरम्यान काहींनी मतभिन्नताही व्यक्त केली. मात्र अखेरीस प्रस्तावाच्या समर्थनार्थ व्यापक सहमती असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यानंतर ‘एक देश, एक निवडणूक’च्या समर्थनार्थ ठराव मांडून तो एकमताने मंजूर करण्यात आला. माजी न्यायमूर्ती विवेक भारती शर्मा यांनी समारोप करताना या प्रस्तावाच्या घटनात्मक, न्यायालयीन, प्रशासकीय आणि आर्थिक पैलूंवर भाष्य केले.

समर्थनाची भूमिका या कार्यक्रमामुळे ‘एक देश, एक निवडणूक’ हा केवळ राजकीय पक्षांच्या चर्चेपुरता विषय न ठेवता कायदा, न्यायव्यवस्था, प्रशासन आणि अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने त्यासाठी समर्थनाची भूमिका तयार करण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. आगामी काळात या प्रस्तावावर संसदेत आणि विविध राजकीय पक्षांमध्ये चर्चा तीव्र होण्याची शक्यता असताना मुंबईतील या बैठकीला राजकीयदृष्ट्याही महत्त्व प्राप्त झाले आहे.

# फोनवर बोलत गाडी चालवणाऱ्या जिम ट्रेनरने ९ वर्षाच्या चिमुकल्याला चिरडले, मुंबईतील थरारक घटना : सुनील मेहरोत्रा

मुंबई : मुंबईतील वांद्रे येथे रविवारी (३० ऑगस्ट) एक भीषण अपघात झाल्याचे समोर आले आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या चारचाकीने धडक दिल्याने एका ९ वर्षांच्या मुलाचा जागीच मृत्यू झाला. या अपघातामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी, संतप्त लोकांची मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी चारचाकी चालवणाऱ्या महिलेला ताब्यात घेतले असून ती वांद्रे येथील एक जिम ट्रेनर असल्याची माहिती समोर आली आहे. प्राथमिक माहितीनुसार, ती महिला गाडी चालवताना मोबाईलवर बोलत होती, त्यामुळे तिचे लक्ष विचलित झाले आणि हा भीषण अपघात घडला. गाडी चालवणाऱ्या महिला जिम ट्रेनरचे नाव मेघना रावल असून ९ वर्षीय अंश गुप्ता याचा या अपघातात मृत्यू झाला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी संध्याकाळी ४ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. ९ वर्षांचा मुलगा रस्त्याच्या कडेला उभा होता, तेव्हा भरधाव वेगाने येणाऱ्या चारचाकीने त्याला धडक दिली. ही टक्कर इतकी जोरदार होती की, तो मुलगा जागेवरूनच दूर फेकला गेला. या धडकेत त्या ९ वर्षाच्या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, गाडी चालवणारी महिला तिच्या मोबाईलवर बोलत होती. फोनमध्ये मग्न असल्यामुळे तिचे रस्त्यावरील लक्ष विचलित झाले आणि आपल्या गाडीसमोर एखादे मुल आले असल्याचे तिचे लक्षात आले नसावे. यामुळे हा भीषण अपघात घडला. महिलेच्या निष्काळजीपणामुळे एका ९ वर्षाच्या चिमुकल्याला प्राणापासून मुकावे लागले.

अपघातानंतर लगेचच, घटनास्थळी असलेल्या स्थानिकांनी त्या महिलेची गाडी थांबवली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. स्थानिक रहिवाशांनी तात्काळ वांद्रे पोलिसांना माहिती दिली. घडलेल्या गंभीर घटनेची माहिती मिळताच, पोलिसांचे एक पथक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांनी आरोपी महिला जिम ट्रेनरला ताब्यात घेतले असून तिची गाडी जप्त करण्यात आली आहे. अपघाताच्या वेळी तिने मद्यप्राशन केले होते का? किंवा इतर अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली होती का? हे निश्चित करण्यासाठी तिची वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलीस त्या महिलेच्या मोबाईल कॉल रेकॉर्ड्स तास्केह जवळच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमधील फुटेजचीही तपासणी करत आहेत. वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# खासगी शाळांतील शिक्षक भरतीसाठी वयोमर्यादा नाही; इच्छुकांना दिलासा

मुंबई : शिक्षक भरतीसाठी वयोमर्यादेची अट असल्यामुळे अनेकांचे शिक्षक होण्याचे स्वप्न अपूर्ण राहात होते. परंतु राज्य शिक्षण आयुक्तांनी काढलेल्या परिपत्रकानुसार नववी ते बारावीच्या खासगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक पदांसाठी कमाल वयोमर्यादा लागू राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शिक्षक भरतीसाठी इच्छुकांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे स्पष्ट झाले आहे

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सुरू असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ च्या आधारे मुलाखतीशिवाय पदनिवडीचा पर्याय दिलेल्या संस्थांमध्ये शिफारस झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीबाबत शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांनी सविस्तर सूचना जाहीर केल्या आहेत.

पवित्र प्रणालीवर उमेदवारांनी स्व-प्रमाणपत्राद्वारे नोंदवलेल्या माहितीच्या आधारे पदांसाठी तात्पुरती शिफारस करण्यात आली आहे. परंतु, नियुक्ती देण्यापूर्वी उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची काटेकोरपणे पडताळणी करणे बंधनकारक केले



आहे. स्व प्रमाणपत्रातील माहिती आणि मूळ कागदपत्रांमध्ये विसंगती आढळल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही.

मात्र संबंधित शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता निर्धारित मुदतीत प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. इयत्ता नववी ते दहावीसाठी उमेदवाराकडे पदवीस्तरावर किमान उत्तीर्ण श्रेणी असणे, तर इयत्ता अकरावी ते बारावीसाठी पदव्युत्तर स्तरावर किमान द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

शिफारस झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी २ ते ५ सप्टेंबर दरम्यान करण्याचे नियोजन आहे. पात्र उमेदवारांसाठी पदस्थापनेचे समुपदेशन ७ ते ११ सप्टेंबरदरम्यान होणार आहे.

### टीईटी पात्रतेचीही अट

इयत्ता पहिली ते पचवीसाठी महाटीईटी / सीटीईटी पेपर १, तर इयत्ता सहावी ते आठवीसाठी संबंधित विषयानुसार पेपर २ पात्रता आवश्यक आहे. उमेदवारांनी शैक्षणिक, व्यावसायिक, जात, जात वैधता, दिव्यांग, समांतर आरक्षण आदी लागू कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

शिक्षण विभागाच्या सूचनेनुसार, खासगी व्यवस्थापनाच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी ते बारावीसाठी सेवा शर्तींच्या नियमांनुसार कमाल वयोमर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे या गटातील शिक्षक पदांसाठी कमाल वयोमर्यादा लागू

उमेदवारांची संख्या कमी असल्यास ५ सप्टेंबरपूर्वीच नियुक्तीची कार्यवाही करण्यात येणार आहेत.

# खेड तालुका रहिवाशी सेवा संस्थेचे स्तुत्य उपक्रम आदर्शवत : सदानंदराव भोसले

दिवा ठाणे : खेड तालुक्यातील दिवा ठाणे येथे सुमारे अडीच हजार घरे केवळ रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील आमच्या बांधवांची आहेत. तर सत्तर टक्के आमचे कोकणस्थ लोक वास्तव्य करतात. अश्या नागरी वस्तीमध्ये एका द्रष्ट्या समाज नेते संस्थापक अध्यक्ष प्रकाश चव्हाण मराठा क्रांती स्वराज्य संघटना रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष व संस्थेचे आधारस्तंभ कृष्णा शेलार यांनी इवलासा वेल लावला तो गगनावरी गेला असल्याचे गौरवोद्गार २३ व्या वर्धापनदिनी विद्यार्थी गुणगौरव सोहळा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मराठा क्रांती स्वराज्य संघटना राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले यांनी काढले. या वेळी राज्य सरचिटणीस प्रकाशराव चव्हाण प्रदेश सचिव निवृत पोलीस अधिकारी आनंद जाधव जिल्हा अध्यक्ष कृष्णा शेलार साजिद शेख,प्रतीक शेवरकर व अन्य



मान्यवर उपस्थित होते.

या वेळी बोलताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश चव्हाण यांनी तेवीस वर्षे केलेल्या कामाचा लेखा जोखा आपल्या भाषणात मांडला. एक उत्तम विचारवंत व साहित्यिक म्हणून ते सुपरिचित आहेत. त्यांचे कार्य अजोड असुन संस्थेचे आधारस्तंभ कृष्णा शेलार यांच्या कार्याचा गौरव त्यांनी केला. अनेक वर्षे विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले त्याची माहिती देण्यात आली. दिवा ठाणे येथील ही संस्था विविध क्षेत्रात अग्रेशिव आहे. या वेळी सलील भोसले, जयसिंग कांबळे, नवनीत पाटील, विजय भोईर, सुरेश मोरे, नागेश गायकवाड, प्रवीण शिबे, प्रदीप बेकर, गौतम कदम गणेश दवंडे, लक्ष्मण जाधव, अमीत जाधव, सतीश निकम, प्रद्या टीचर, प्रवीण उतेकर सौ अनिता पवार बबन सपकाळ उषा मुंढे सचिव रणजिता मोरे खजिनदार मिलींद शिंदे कार्याध्यक्ष संतोष जोशी, संपर्क प्रमुख प्रतीक शेवरकर कार्यवाहक सचिन कदम सल्लागार सतीश उतेकर यांच्या सह शेकडो समाज बांधव पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुंबईत गणेशोत्सवात ४ दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपकाला परवानगी

मुंबई: यंदाच्या गणेशोत्सवात एकूण चार दिवस रात्री १२ वाजेपर्यंत धनिक्षेपक लावण्याची परवानगी जिल्हाधिकाऱ्यांनी दिली आहे. यामध्ये गणेशोत्सवाचा दुसरा दिवस, पाचवा दिवस, गौरी विसर्जनाचा दिवस आणि अनंत चतुर्दशीचा दिवस या दिवशीही परवानगी देण्यात आली आहे. मात्र हे चारही दिवस विसर्जनाचे असल्याने मंडळांना स्थानिक कार्यक्रम घेण्यासाठी अजून एक दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक लावण्याची सूट मिळावी अशी मागणी समन्वय समितीने केली आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रात्री उशिरापर्यंत ध्वनिक्षेपक लावण्याची परवानगी देण्यासाठी दिवस ठरवून देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयाला देण्यात आले आहेत. त्यानुसार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयाने आपल्या अधिकारातील १५ पैकी १३ दिवसांची यादी फेब्रुवारी महिन्यात जाहीर केली होती. त्यात यंदाच्यावर्षी मुंबईत गणेशोत्सव कालावधीत चार दिवस रात्री उशीरापर्यंत ध्वनिक्षेपक लावण्याची परवानगी देण्यात आली आहे.



ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० नुसार बंद जागांखेरीज अन्य ठिकाणी सांस्कृतिक किंवा धार्मिक कारणासाठी काही ठराविक दिवसांकरिता सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक किंवा ध्वनिवर्धक यांचा वापर करता येतो. हा कायदा ध्वनीप्रदुषण कमी करण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लागू करण्यात आला आहे. त्यात आवाजाची मर्यादा निश्चित केली आहे. श्रोतेगृह, सभागृह, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंदिस्त जागा वगळून त्या ठिकाणी हे ध्वनिक्षेपक लावता येतात.

मुंबई शहरासाठी एकूण १५ दिवसांपैकी प्रत्येक सणासाठी वेगवेगळे दिवस दिले आहेत. त्यात नवरात्री, दिवाळी, ख्रिसमस, ईद या सणांचाही समावेश आहे. त्यापैकी गणेशोत्सवासाठी चार दिवस दिले आहे. त्यात दीड दिवसाच्या गणेश विसर्जनासाठी १५ सप्टेंबर ऑगस्ट, पाचव्या दिवसाच्या विसर्जनासाठी १८ सप्टेंबरचा दिवस, गौरी विसर्जनासाठी १९ सप्टेंबरचा दिवस आणि अनंत चतुर्दशीसाठी २५ सप्टेंबर असे चार दिवस रात्री उशीरापर्यंत ध्वनीक्षेपक लावण्याची परवानगी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव कालावधीत रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक लावण्याची परवानगी देण्यासाठी दिवस जाहीर केले आहे.हे चारही दिवस विसर्जनाचे असल्याने मंडळांना स्थानिक कार्यक्रम घेण्यासाठी अजून एक दिवस रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक लावण्याची सूट मिळावी, अशी मागणी गणेशोत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. नरेश दहिबावकर यांनी केली आहे.

### सवलत कधी ?

गणेशोत्सव (दुसरा दिवस): १५ सप्टेंबर २०२६ (मंगळवार)
पाचवा दिवस: १८ सप्टेंबर २०२६ (शुक्रवार)
गौरी विसर्जन: १९ सप्टेंबर २०२६ (शनिवार)
अनंत चतुर्दशी (विसर्जन मिरवणूक): २५ सप्टेंबर २०२६ (शुक्रवार)

# विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या मिळेना! पालिकेचा ५२ कोटींचा निधी मंजूर

मुंबई: मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने मोफत गणवेश आणि वह्यांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर केला असतानाही, शैक्षणिक वर्ष सुरू होऊन तीन महिने उलटले, तरीसुद्धा विद्यार्थ्यांना अद्यापही या साहित्याचे वाटप करण्यात आलेले नाही.

मंजूर झालेला कोट्यवधींचा निधी कागदावरच अडकल्याने गरीब आणि सामान्य कुटुंबांतील पालकांना स्वतः



च्या खिशातून पैसे खर्च करून खुल्या बाजारातून युनिफॉर्म व साहित्याची खरेदी करावी लागत आहे. महापालिकेच्या या गंभीर प्रशासकीय दिरंगाईविरोधात काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत

> **निधी उपलब्ध असूनही पुरवठा न होणे हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून कंत्राट व्यवस्थापन आणि सार्वजनिक निधीच्या वापरावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा प्रकार आहे.**
> **- डॉ. अजंता यादव,**
> नगरसेविका - काँग्रेस पक्ष

तीव्र विरोध दर्शवला आहे.

महापालिकेने विद्यार्थ्यांच्या मोफत युनिफॉर्मसाठी रुपये १२१.७४ कोटी आणि वह्या/नोटबुकसाठी रुपये २९.५९ कोटी असा एकूण १५१.३३ कोटींचा निधी जून २०२६ मध्येच मंजूर केला होता. कंत्राटदारांमार्फत हे साहित्य वेळेत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित होते. मात्र, सुमारे ३.१० लाख महापालिका विद्यार्थ्यांपर्यंत हे साहित्य अद्याप पोहोचलेले नाही.

न्यायालयाच्या निर्णयांचा दाखला या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांचा दाखला देत काँग्रेस नगरसेविका डॉ. अजंता यादव यांनी प्रशासनाला धारेवर धरले. 'कंचन इंडिया लि. विरुद्ध महाराष्ट्र शासन' आणि 'ओम एज्युकेशन सोसायटी विरुद्ध महाराष्ट्र शासन' या प्रकरणांत मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शैक्षणिक सुविधा वेळेत देणे हे प्रशासनाचे कायदेशीर कर्तव्य आहे. प्रशासकीय निष्क्रियतेमुळे पालकांवर अतिरिक्त आर्थिक भार टाकणे पूर्णतः अन्यायकारक आहे.

# मुंबईतील ‘निफ्ट’चे केंद्र कात टाकणार



## मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती

मुंबई : राष्ट्रीय फॅशन तंत्रज्ञान संस्थेच्या (निफ्ट) मुंबई केंद्राच्या शैक्षणिक, आर्थिक आणि पायाभूत विकासाला गती देण्यासाठी राज्य सरकारने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापन केली आहे. केंद्राचा सर्वांगीण विकास साधण्याबरोबरच राज्य सरकार, शैक्षणिक संस्था आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील समन्वय बळकट करण्याची जबाबदारी समितीवर सोपविण्यात आली आहे.

निफ्ट ही देशातील फॅशन डिझाईन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य संस्था आहे. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या या संस्थेला ‘राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थेचा’ दर्जा मिळाला आहे. संस्थेच्या माध्यमातून भारतीय वस्त्रोद्योग आणि जागतिक फॅशन जगताला कुशल मनुष्यबळ मिळते.

राज्यात १९९५ मध्ये नवी मुंबईतील खारघर येथे १० एकर जागेत निफ्टचे केंद्र सुरू झाले. मात्र फॅशन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा (एआइ), थ्रीडी डिझायनिंग आणि आधुनिक प्रयोगशाळांसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचा विस्तार ज्या वेगाने व्हायला हवा होता, तसा झाला नाही. त्यामुळे फॅशन आणि मनोरंजनाची पंढरी समजल्या जाणाऱ्या मुंबईच्या मनोरंजन क्षेत्रात या संस्थेकडून म्हणावे तसे योगदान झाले नाही.

# मुंबई लोकलमध्ये चुकून महिलांच्या डब्यात चढला तरुण; चालत्या ट्रेनमधून उडी मारण्याचा प्रयत्न, महिलांनी वाचवलं

मुंबई : मुंबई लोकलमध्ये प्रवास करताना घाईगडबडीत डबा चुकण्याच्या घटना घडत असतात. मात्र, एका तरुणाची चूक त्याच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली होती. महिलांच्या डब्यात चुकून चढलेल्या या तरुणाला आपली चूक लक्षात आल्यानंतर त्याने चालत्या लोकलमधून उतरण्याचा प्रयत्न केला.

मात्र, प्रसंगावधान राखत डब्यातील महिलांनी त्याला पकडून मागे खेचलं आणि संभाव्य दुर्घटना टळली. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

चुकून महिलांच्या डब्यात चढला तरुण

व्हायरल व्हिडिओमध्ये एक तरुण मुंबई लोकलच्या महिलांच्या डब्यात उभा असल्याचं दिसत आहे. काही वेळाने त्याला आपण चुकीच्या डब्यात चढल्याचं लक्षात येतं. महिलांनीही त्याला याबाबत सांगितल्यानंतर तो घाबरल्याचं व्हिडिओत दिसतं.

आपली चूक लक्षात आल्यानंतर तरुणाने ट्रेन थांबण्याची वाट न पाहता चालत्या ट्रेनमधून उतरण्याचा प्रयत्न केला. मात्र, हा प्रयत्न अत्यंत धोकादायक असल्याचं लक्षात येताच डब्यातील महिलांनी त्याला अडवलं.

# जात पडताळणी समित्या रद्द केल्यास कुणीही आरक्षणात घुसेल: भुजबळ

मुंबई: मनोज जरांगे यांच्या मागणीनुसार जात पडताळणी समित्या रद्द केल्यास कुणीही आदिवासी किंवा अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र घेऊन आरक्षित प्रवर्गात प्रवेश करू शकतो, अशी भीती अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

अनेकवेळा चुकीची प्रमाणपत्रे काढून लोकांनी नोकऱ्या लाटल्या आहेत. यावरून सर्वोच्च न्यायालयानेही फटकारले आहे. त्यामुळे जात पडताळणी समित्या महत्त्वाच्या आहेत.

मुंबईत राहात असेल तर अमराठी रहिवाशांना कामापुरती मराठी शिकावीच लागेल, अशा शब्दांत भुजबळ यांनी मराठी शिकण्यास नकार देणाऱ्यांना समज दिली. महाराष्ट्रातील वाहनचालकांसाठी मराठी भाषा शिकण्याच्या नियमावरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी या नियमाचे समर्थन केले.

आपले लोक चेन्नईला गेले तर त्यांना तेथील भाषा येते. गुजरातमध्ये गेले तर गुजरातीमध्ये बोलतात. दुसऱ्या राज्यात गेल्यावर भाषा शिकायला वेळ लागणारच. परंतु प्रश्न मराठी शिकण्याचा नसून त्यासाठी लागणारा वेळ देण्याचा आहे. भाषा शिकायची असेल तर निश्चितच काही काळ लागतो, असेही भुजबळ म्हणाले.

महाराष्ट्रातील लोकही इतर राज्यांत राहतात आणि तेथील स्थानिक भाषा शिकतात, याची आठवण त्यांनी करून दिली. सध्या निवडणुका नसल्याने मतांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे, असे म्हणता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुंभमेळ्याशी संबंधित कथित बोगस नोकरभरतीच्या प्रश्नावर भुजबळ यांनी कोणतेही बनावट नोकरभरतीचे रॅकेट असेल तर पोलीस त्याचा पर्दाफाश करतील, असे स्पष्ट केले.

मुंबईच्या महापौरपदासाठी शिंदे शिवसेनेकडून इच्छा व्यक्त केली जात असल्याबाबत विचारले असता भुजबळ म्हणाले, इच्छा व्यक्त करण्यात काहीही चूक नाही. मात्र महापौरपदाबाबत सर्वजण एकत्रित बसून निर्णय घेत असतात, असेही छगन भुजबळ म्हणाले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

मुख्य लेखा व वित्त विभाग

मुदत ठेवी ठेवणेसाठी व्याजदर मागविणेबाबत

ठाणे महानगरपालिकेच्या १५ वा वित्त आयोग या खात्यामधील रक्कमेची गुंतवणूक करणेसाठी ठाणे महापालिका क्षेत्रातील फक्त राष्ट्रियकृत बँकांकडून व्याजदर मागविणेत येत आहेत. तरी, ठाणे महापालिका क्षेत्रातील राष्ट्रियकृत बँकांनी व्याजदर, ग्राहय दिनांक इ, माहिती ठाणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील तक्त्यानुसार माहिती व व्याजदर नमूद करुन cafoinvest @thanecity.gov.in या email वर अथवा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नावे मुख्य लेखा विभाग दुसरा मजला, ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी ठाणे येथे दि.३१/०८/२०२६ रोजी पर्यंत स्वतंत्र पत्र देऊन व्याजदर देण्यात यावेत, तदनंतर प्राप्त व्याजदराच्या पत्राचा विचार करण्यांत येणार नाही.अधिक माहिती www.thanecity.gov.in येथे उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/लेवविवि/४३७/२०२६-२७ सही/-

दि:२७.०८.२०२६ मुख्य लेखा व वित्त अधिकारी

ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

# कॉकरोच पार्टी

**अग्रलेख**

दिल्लीच्या जंतर-मंतरवरील नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनातून चर्चेत आलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी 'कॉकरोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षांबाबत केलेले वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. दीपके, सौरव दास आणि आशुतोष रंका यांच्यामध्ये राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत, असे वांगचुक यांनी स्पष्टपणे म्हटले आहे. मात्र, त्याच वेळी त्यांनी या महत्त्वाकांक्षांना दोष मानलेले नाही. उलट, राजकारणात जाण्याची इच्छा असणे स्वाभाविक असल्याचे सांगत त्यांनी आंदोलनाची अराजकीयता आणि पवित्रता जपण्यावर अधिक भर दिला आहे. या वक्तव्याकडे केवळ तीन व्यक्तींच्या राजकीय भवितव्याच्या संदर्भात पाहणे योग्य ठरणार नाही. त्यामागे आंदोलन आणि राजकारण यांच्यातील नाजूक नाते, जनतेचा विश्वास आणि सामाजिक चळवळींचे भवितव्य यांचा व्यापक प्रश्न दडलेला आहे.

लोकशाही व्यवस्थेत राजकीय महत्त्वाकांक्षा असणे हा गुन्हा नाही. उलट, समाजातील प्रश्नांवर काम करणाऱ्या व्यक्तीने पुढे जाऊन धोरणनिर्मितीत सहभागी व्हावे, सत्ता व्यवस्थेवर प्रभाव टाकावा आणि आपल्या विचारांना संस्थात्मक रूप द्यावे, अशी इच्छा असणे स्वाभाविक आहे. सामाजिक कार्यकर्ता, आंदोलक आणि राजकीय नेता यांच्यात स्पष्ट सीमारेषा असली तरी या तीनही भूमिका एखाद्या व्यक्तीच्या सार्वजनिक जीवनात वेगवेगळ्या टप्प्यांवर येऊ शकतात. त्यामुळे दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत, या वांगचुक यांच्या वक्तव्याकडे संशयाच्या नजरेने पाहण्याची गरज नाही. मात्र, प्रश्न महत्त्वाकांक्षेचा नसून त्या महत्त्वाकांक्षेचा आंदोलनाशी असलेला संबंध किती पारदर्शक आहे, हा आहे. जंतर-मंतरवरील नीट पेपरफुटीविरोधी आंदोलनाने देशातील विद्यार्थ्यांच्या असंतोषाला व्यासपीठ दिले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या लाखो तरुणांसाठी परीक्षा म्हणजे केवळ प्रश्नपत्रिका आणि निकाल नव्हे; त्यांच्या अनेक वर्षांच्या मेहनतीचे, कुटुंबाच्या आर्थिक त्यागाचे आणि भविष्यातील स्वप्नांचे ते प्रतीक असते. अशा वेळी पेपरफुटी किंवा परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांविरोधात उभे राहणाऱ्या आंदोलनाला व्यापक जनसमर्थन मिळणे साहजिक आहे. या आंदोलनात सोनम वांगचुक यांनी २६ दिवस उपोषण केले, ही बाब त्याच्या गांभीर्याची साक्ष देते. परंतु अशा आंदोलनाला राजकीय पक्षाचे स्वरूप आले, तर परिस्थिती बदलते. आंदोलनातील प्रत्येक मागणी, प्रत्येक घोषणा आणि प्रत्येक निर्णयाकडे राजकीय हेतूने पाहिले जाऊ लागते. आंदोलनकर्त्यांची भूमिका योग्य असली तरी विरोधक त्याला राजकीय रंग देऊ शकतात. परिणामी, ज्या प्रश्नासाठी जनता रस्त्यावर उतरली आहे, तो प्रश्न बाजूला पडून आंदोलन करणाऱ्यांच्या राजकीय भूमिकेची चर्चा सुरू होते. वांगचुक यांनी नेमका हाच धोका ओळखला आहे. भारतीय राजकारणाच्या इतिहासात आंदोलनातून राजकारणात आलेल्या नेतृत्वाची उदाहरणे कमी नाहीत. अण्णा हजारे यांच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राजकीय पक्षाची स्थापना केली. पुढे आम आदमी पक्षाने दिल्लीच्या राजकारणात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आणि इतर राज्यांतही विस्तार करण्याचा प्रयत्न केला. या प्रवासाने एक महत्त्वाचा धडा दिला, चळवळीतून राजकारणात जाणे शक्य आहे; परंतु चळवळ आणि पक्ष यांची भूमिका एकच नसते.

अण्णा आंदोलनाच्या काळातही आंदोलनाच्या व्यासपीठाचे पुढे काय करायचे, या प्रश्नावर मतभेद निर्माण झाले होते. काहींना व्यवस्था बदलण्यासाठी थेट राजकारणात उतरावे असे वाटत होते, तर काहींना आंदोलन स्वतंत्र सामाजिक दबावगट म्हणूनच राहावे असे वाटत होते. अखेरीस दोन वेगळे मार्ग निर्माण झाले. त्यामुळे आज दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांबाबत वांगचुक यांनी केलेले वक्तव्य त्या व्यापक राजकीय वास्तवाचीच आठवण करून देते. खरे तर प्रत्येक सामाजिक आंदोलनासमोर हा प्रश्न उभा राहतो. आंदोलनाला जनसमर्थन मिळते, नेतृत्व लोकप्रिय होते, माध्यमांचे लक्ष वेधले जाते आणि सत्ताधाऱ्यांवर दबाव निर्माण होतो. अशा परिस्थितीत आंदोलनातील नेतृत्वाला राजकीय पर्याय उपलब्ध होणे अपरिहार्य आहे. प्रश्न असा आहे की, त्या टप्प्यावर आंदोलनाची विश्वासार्हता कशी टिकवायची ? वांगचुक यांचे म्हणणे येथे महत्त्वाचे ठरते. त्यांनी दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा असल्याबद्दल दोष दिलेला नाही. उलट ते अभ्यासू आणि चांगली माणसे असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, आंदोलन सुरू असताना त्याला राजकीय स्वरूप देऊ नका, असा सल्ला त्यांनी दिला होता. हा सल्ला त्यांनी अनुभवातून दिलेला आहे.

लोकशाहीत दबावगटांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, जनतेच्या प्रश्नांसाठी संघटित आवाज उठवणारे स्वतंत्र व्यासपीठ असणे आवश्यक आहे. शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना, कामगार संघटना, पर्यावरणवादी चळवळी आणि नागरिक मंच हे सत्तेवर प्रश्न उपस्थित करतात. त्यांची ताकद त्यांच्या पक्षीय ओळखीत नसून त्यांच्या स्वायत्ततेत असते. म्हणूनच वांगचुक यांनी आंदोलनाला तटस्थ राजकीय दबावगट म्हणून ठेवण्याची भूमिका मांडली, ती विचार करण्यासारखी आहे. मात्र, याचा दुसरा पैलूही तितकाच महत्त्वाचा आहे. राजकारणापासून पूर्णपणे अलिप्त राहून सामाजिक बदल घडवता येतो का ? हा प्रश्नही विचारावा लागेल. यामुळेच आंदोलन राजकीय असू नये, पण आंदोलनकर्त्याला राजकीय होण्याचा अधिकार असावा, अशी संतुलित भूमिका अधिक योग्य ठरते. व्यक्तीला राजकारणात जाण्याचे स्वातंत्र्य असावे; परंतु त्यासाठी आंदोलनाच्या व्यासपीठाचा पक्षीय वापर होऊ नये.

आजच्या काळात सोशल मीडिया, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि यूट्यूबच्या माध्यमातून एखादी चळवळ अल्पावधीत देशव्यापी होऊ शकते. त्याच वेगाने त्या चळवळीला राजकीय लेबलही लागू शकते. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी पारदर्शकता, आर्थिक शुचिता, निर्णयप्रक्रियेतील स्पष्टता आणि राजकीय संबंधांबाबत प्रामाणिकपणा राखणे गरजेचे आहे. दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकीय महत्त्वाकांक्षा आहेत की नाहीत, यापेक्षा त्यांची पुढील भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे.त्याबाबत आजच अंतिम निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. वांगचुक यांच्या वक्तव्याचा अर्थ हाच आहे की, व्यक्तींच्या महत्त्वाकांक्षेपेक्षा चळवळीची विश्वासार्हता मोठी असते. राजकीय महत्त्वाकांक्षा असणे चुकीचे नाही; परंतु आंदोलनाचा विश्वासघात होऊ नये, ही अपेक्षा रास्त आहे. भारतीय लोकशाहीला अशा स्वतंत्र, जागरूक आणि निर्भीड चळवळींची गरज आहे. राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगणे चुकीचे नाही. मात्र महत्त्वाकांक्षेसाठी लोकांचा विश्वास गमावणे हा दोष असतो. दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राजकारणात जायचे असेल तर त्यांनी जावे; पण त्यासाठी आंदोलनाची पवित्रता, पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अबाधित ठेवला पाहिजे. कारण चळवळी व्यक्तींपेक्षा मोठ्या असतात आणि जनतेचा विश्वास हा कोणत्याही राजकीय महत्त्वाकांक्षेपेक्षा मौल्यवान असतो.

# प. पू. टेंब्ये स्वामी महाराज: एक जाज्वल्य दत्तावतार

( 01-07 सप्टेंबर- श्रावण शुद्ध षष्ठी: प. पू. टेंब्ये स्वामी महाराज जयंती विशेष. )

**एक जाज्वल्य दत्तावतार म्हणजे सन १८५४ ते १९१४ ह्या काळात होऊन गेलेले परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराज होय. श्रीक्षेत्र माणगाव येथे श्री हरिभट टेंबे या दत्तोपासकाचे वास्तव्य होते. त्यांचे थोरले चिरंजीव श्री. गणेशपंत टेंबे हे मुळचेच विरक्त होते. वडिलांच्या दत्तभक्तीचा वारसा श्री. गणेशपंतांनी उचलला होता. ते दररोज श्री दत्तपादुकांची पूजा व श्रीगुरुचरित्राचे वाचन करीत असत. श्रीनृसिंहसरस्वती स्वामी महाराजांच्या आशीर्वादाने श्रावण शुद्ध षष्ठीला श्रीदत्तरूपाने श्री गणेशपंत टेंब्यांच्या घरी अवतार घेतला. नवजात बालकाचं बाराव्या दिवशी थाटात बारसं झालं आणि बाळाचं नाव 'वासुदेव' ठेवण्यात आलं. बालपणापासूनच प्रगल्भ बुद्धिमत्ता आणि तेजस्वी वाणी असणाऱ्या वासुदेवाची छाप कोणावरही चटकन पडत असे. लहानपणीच वेद मुखोद्गत करून सर्व शास्त्रांचं अध्ययन त्यांनी केलं होतं. वयाच्या बाराव्या वर्षी दशग्रंथी ब्राह्मण म्हणून ते प्रसिद्ध झाले.**

श्रीवासुदेव शास्त्रीबुवांचा विवाह त्यांच्या वयाच्या २१व्या वर्षी श्रीबाबाजीपंत गोडे यांची कन्या अन्नपूर्णाबाईशी झाला व तद्नंतर त्यांनी 'स्मार्तागी' उपासना सुरू केली. त्या सोबत श्रीगायत्री पुरश्चरण आणि ज्योतिषाचा अभ्यास चालू होताच. वडिलोपार्जित दत्तभक्तीचा वारसा श्रीवासुदेव शास्त्रीबुवांकडे आला होताच. अखंड वेदाध्ययन, वैयक्तिक साधना आणि त्यासोबत पीडितांना मार्गदर्शन यांची त्याला मिळालेली जोड, यामुळे ते लहान वयातच उच्च आध्यात्मिक अनुभवाचे अधिकारी बनले. परिणामस्वरूप त्यांना स्वप्नदृष्टांतासह श्रीदेवांची- भगवान श्रीदत्तात्रेय वाणी ऐकू येत असे. संत नामदेवांबरोबर ज्याप्रमाणे श्रीविठ्ठल बोलत असे, त्याप्रमाणे भगवान श्रीदत्तात्रेय त्यांच्याशी संवाद साधत असत. त्यांचं संपूर्ण जीवन त्या पथप्रदर्शक श्रीदेववाणीच्या प्रकाशातच व्यतीत झालं, एवढंच नव्हे तर त्यांच्या संपर्कात जे जे आले, त्या त्या सर्वांचं जीवन त्यांनी त्या वाणीसामर्थ्याद्वारे उजळून टाकलं.

कोकणातील माणगाव येथील ही घटना आहे. एका गृहस्थाच्या घरी दुभती गाय होती. ती त्या दिवशी काही केल्या दूध काढू देईना. ती गाय लाथा झाडीत असे. त्या गृहस्थाला कुणी तरी गावातील श्री गणेशभट टेंबे यांच्या मुलाचे नाव सुचविले. त्याचे नाव वासुदेव. वासुदेवाला- श्रीमद्‌परमहंस परिव्राजकाचार्य वासुदेवानन्द सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांना मंत्रांची माहिती होती. गाय दूध देईनाशी झाली होती, तीच्यावर मंत्रप्रयोग करण्यासाठी टेंब्यांच्या वासुदेवाला आमंत्रण देण्यात आले. वासुदेव त्या गृहस्थाच्या घरी उपस्थित झाले आणि त्यांनी त्या धिंगाणा घालणाऱ्या गायीवर मंत्रप्रयोग केला. मंत्रप्रयोग केल्यानंतर लाथा झाडणारी ती गाय अगदी शांत झाली होती; मग ती दूध काढू द्यायला तयार झाली. वासुदेव हा एकपाठी होता. एकदा वाचलेली गोष्ठ त्यांची तोंडपाठ होत असे. वयाच्या बाराव्या वर्षीच त्याने ऋग्वेद संहिता, पदे, घन, इत्यादीचा अभ्यास केला होता. याच वेळी ते दशग्रंथी ह्या नावाने प्रसिद्धीस पावले. गुरुचारीत्राचा पाठ ते प्रतिदिनी वाचत असत. वयाच्या पंधराव्या वर्षापासून लोक टेंब्यांच्या वासुदेवाला शास्त्रीबुवा म्हणून संबोधू लागले. त्या वेळी उज्जैनीला जाण्यासाठी म्हणून शास्त्रीबुवा नर्मदा तीरावरच्या मंडलेश्वर ह्या गावी आलेले होते. तेथे कैवल्याश्रम स्वामी नावाचे थोर सत्पुरुष वास्तव्य करीत होते. शास्त्रीबुवांनी स्वामींची भेट घेऊन चर्चा केली. त्या वेळी स्वामींनी मी तुम्हाला दंड देतो असे सांगितले. त्यामुळे शास्त्रीबुवा उज्जैनीला न जाता मंडलेश्वरलाच राहिले. त्याच रात्री श्रीदत्त भगवान हे शास्त्रीबुवांच्या स्वप्नात गेले व त्यांना विचारू लागले की तुम्ही माझी आज्ञा उल्लंघन करणार की काय? दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यावर शात्रीबुवानी स्वप्नातली सारी हकिकत कैवल्याश्रम स्वामींच्या कानावर घातली. हे ऐकल्यावर स्वामींनी शास्त्रीबुवाना दंड दिला नाही.

नंतर शास्त्रीबुवा तेथून निघून उज्जैनीला येऊन पोचले. तिथल्या दत्त मंदिरात जाऊन शास्त्रीबुवांनी नारायण स्वामींची भेट घेतली व त्यांना नमस्कार करून मंडलेश्वर गावी, कैवल्याश्रम स्वामींकडे घडलेली हकिकत निवेदन केली. त्यावर नारायण स्वामी त्यांना म्हणाले, अनिरुद्धस्वामी हे माझे सद्गुरूमहाराज आहेत. त्यांनी जर जर का आज्ञा केली तर मला तुमाला दंड देता येईल. एरवी दंड देता येणार नाही. शास्त्रीबुवा अनिरुद्धास्वमींकडे गेले व त्यांना आदरपूर्वक नमस्कार करून आपली सारी हकिकत त्यांच्या कानावर घातली. तेव्हा ते म्हणाले, "फार उत्तम!" नंतर स्वामींनी नारायणस्वामींना बोलावून घेतले आणि शास्त्रीबुवाना दंड देण्याविषयी आज्ञा केली. जेष्ठ वद्य द्वितीयेच्या दिवशी शास्त्रीबुवाना दंड देण्याचा विधी झाला आणि त्यांचे नाव वासुदेवानंद सरस्वती असे ठेवण्यात आले. त्या दिवसापासून सारे लोक शास्त्रीबुवांना, वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज म्हणू लागले. त्या दिवशी वासुदेवानंदानी नारायण स्वामींबरोबर भिक्षा केली. श्री दत्तमहाराजांना ही गोष्ट पसंत पडली नाही. वासुदेवानंदांना ओकाऱ्या सुरु झाल्या. कितीही उपाय केले तरी त्या थांबत नव्हत्या. नारायण स्वामी घाबरून गेले. श्री दत्तमहाराजांची आज्ञा उल्लंघन केल्यामुळे हा सारा प्रकार झाला, असे कळताच नारायण स्वामींनी श्री दत्तमहाराजांना वंदन करून त्यांची प्रार्थना केली, "दत्तमहाराज! हा आपला शिष्य आहे व मीही आपलाच शिष्य आहे. माझ्या अपराधाबद्दल मला क्षमा करा आणि ह्या आपल्या शिष्याला आपण बरं करा. ह्या पुढे आपल्या आज्ञेविरुद्ध कोणतेही कार्य यांना कधी सांगणार नाही व त्यानंतर वासुदेवानंदांच्या ओकाऱ्या थांबल्या.

नरसोबाच्या वाडीला श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे स्मृतिमंदिर आहे. नरसोबा वाडीचे दत्तस्थान हेच श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे प्रेरणास्थान होय. श्रीक्षेत्र माणगाव येथे श्रीवासुदेव शास्त्रीबुवांनी स्थापन केलेलं श्रीदत्तमंदिर, हा त्या श्रीदेववाणीचाच आज्ञारूप आविष्कार आहे. यापुढील सात वर्षे आपण माणगावमध्ये राहणार आहोत, ह्या शब्दांमध्ये श्रीदत्तात्रेयांनी आपल्या परमभक्ताला आश्वासित केलं आणि माणगावात श्रीदत्तमंदिराची स्थापना करविली. ते वर्ष होतं सन १८८३ भगवान श्रीदत्तात्रेय आणि श्रीवासुदेव शास्त्रीबुवा, ह्या देव-भक्ताच्या आल्हाददायक लीलांना साक्षी होण्याचे भाग्य माणगावकरांना लाभले. तसेच हजारो भक्तांनी श्रीदत्तात्रेयांच्या तेथील सान्निध्याचा अनुभव घेत आपले लौकिक आणि पारलौकिक कल्याणही साधून घेतले. माणगावचे श्रीदत्तमंदिर हे श्रीक्षेत्र नृसिंहवाडीचाच एक भाग आहे, अशी धारणा श्रीवासुदेव शास्त्रीबुवांची होती.

अशाप्रकारे सात वर्ष गेल्यानंतर एके दिवशी वासुदेव शास्त्रीबुवांनी माणगाव सोडण्याची श्रीदेवांची आज्ञा झाली. जितक्या आत्मीयतेने श्रीवासुदेव शास्त्रीबुवांनी ते दत्तस्थान उभारलं आणि वाढवलं होतं, तितक्याच निरपेक्षेतेने आणि तत्परतेने त्यांनी आपल्या सौभाग्यवतींसह पौष मासात सन १८८९ मध्ये श्रीक्षेत्र माणगाव सोडले आणि तीर्थयात्रेला प्रारंभ केला. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांविषयी पुढील संस्कृत श्लोक ग्वाही देतो-

"जितेंद्रिय गणाग्रणीरभिरत: परे ब्रह्मणि ।
कलौ श्रुतिपथावनेऽत्रितनयोऽवतीर्ण: स्वयम् ॥
करात्तसुकमण्डलु: कुमतखण्डने दण्डभृत् ।
पदप्रणतवत्सलो जयति वासुदेवो यति: ॥"

स्वामी महाराजांच्या श्रीसप्तशती गुरुचरित्र, दत्तचंपू, शिक्षात्रय, करुणात्रिपदी, दत्तलीलामृताब्धिसार: या ग्रंथांनी दत्त संप्रदायाला तात्त्विक आधार दिला. वामनराव गुळवणी यांनी टेंबे स्वामींच्या समग्र साहित्याचे १२ खंड १९५० साली प्रकाशित केले.

आध्यात्मिक आणि सामाजिक योगदान : टेंबे स्वामी महाराज हे श्रीस्वामी समर्थ, श्रीसाईबाबा आणि श्रीगजानन महाराज यांचे समकालीन होते. या सर्व संतांच्या चरित्रात टेंबे स्वामींचा उल्लेख आढळतो. त्यांनी समाजात प्रेम, करुणा आणि सत्याचा प्रसार केला. त्यांचे प्रवचन आणि साहित्य यांनी भक्तांना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. माणगाव दत्त मंदिर- माणगाव येथील दत्त मंदिर त्यांच्या वास्तव्याने पावन झाले. मंदिरातील दोन लाकडी खांब त्यांनी अभिमंत्रित केले असून, त्यांच्या स्पर्शाने बाधा निवारण होते, अशी भक्तमंडळीत श्रद्धा आहे. दि.२४ जून १९१४ रोजी- आषाढ शुक्ल प्रतिपदा, शके १८३६ ला नर्मदाकिनारी गरुडेश्वर- गुजरात येथे त्यांनी समाधी घेतली. त्यांनी स्वेच्छेने देहत्याग केला, ज्याला संत परंपरेत संजीवन समाधी असे म्हणतात. स्वामींनी शास्त्रोक्त नियमांचे काटेकोर पालन केले. कोणताही विषय सहज आत्मसात करण्याची त्यांची हातोटी होती. त्यांचा स्वभाव अतीव प्रेमळ आणि लोकांप्रती करुणामय होता. त्यांच्या चरित्रात अनेक चमत्कारांचा उल्लेख आहे, जसे की माणगावात गायीला दूध काढण्यास मदत करणे. टेंबे स्वामींच्या कार्यामुळे दत्त संप्रदायाला नवजीवन मिळाले. त्यांचे साहित्य आणि मंत्र आजही भक्तांना प्रेरणा देतात. माणगाव येथील दत्त मंदिर आणि गरुडेश्वर येथील समाधी मंदिर ही भक्तांसाठी पवित्र स्थाने आहेत. त्यांनी स्थापन केलेली प्रश्नावली आजही भक्तांच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी वापरली जाते, असे कळते. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी! !! प. पू. टेंब्ये स्वामी महाराजांना जयंती सप्ताह निमित्त विनम्र अभिवादन जी !!

- संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.
राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सअॅप- 9423714883.

# भटक्या-विमुक्तांच्या मुक्तीपासून सन्मानाच्या वाटचालीपर्यंत

३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक दिवस आहे. हा केवळ एखादा स्मृतिदिन नाही, तर अन्याय, कलंक, उपेक्षा आणि सामाजिक बहिष्काराच्या दीर्घ इतिहासातून स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास २०२५ मध्ये अधिकृत मान्यता दिली. त्यामुळे हा दिवस साजरा करताना केवळ औपचारिक कार्यक्रम न करता भटके-विमुक्त समाजाच्या ऐतिहासिक वेदना, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील संधी यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

भारतीय समाजरचनेत भटक्या आणि विमुक्त जमातींचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उपजीविकेच्या पारंपरिक साधनांनुसार, जीवनपद्धतीनुसार आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक समूहांनी भटकंतीचे जीवन स्वीकारले. काही समूह पारंपरिक कला, लोककला, पशुपालन, हस्तकला, मनोरंजनाचे विविध प्रकार, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लघु व्यापार, लोहारकाम, दगडकाम, बांधकामाशी संबंधित कौशल्ये किंवा इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून होते. स्थिर गावव्यवस्थेच्या चौकटीबाहेर राहणाऱ्या या समूहांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या बळावर समाजजीवनात महत्त्वाचे योगदान दिले. मात्र स्थिर वस्ती, जमीन आणि पारंपरिक सामाजिक संस्थांच्या अभावामुळे त्यांना सामाजिक सुरक्षेपासून आणि संस्थात्मक संधींपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहावे लागले.

भटके आणि विमुक्त या संज्ञांमध्ये सूक्ष्म फरक आहे. भटक्या जमातींच्या जीवनपद्धतीत स्थलांतर आणि भटकंतीला विशेष महत्त्व असते; तर 'विमुक्त' ही संज्ञा ब्रिटिश राजवटीत 'गुन्हेगार जमाती' म्हणून कलंकित करण्यात आलेल्या आणि नंतर त्या कायदेशीर कलंकातून मुक्त झालेल्या समुदायांसाठी वापरली जाते. महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त समाजात अनेक विविध जाती-जमातींचा समावेश होतो. या विविध समूहांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती एकसारखी नसली तरी ऐतिहासिक उपेक्षा आणि सामाजिक कलंकाचा अनुभव अनेक समूहांना समानपणे सहन करावा लागला आहे.

या समाजाच्या इतिहासातील सर्वांत काळा अध्याय म्हणजे ब्रिटिशांनी लागू केलेला 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट' होय. १८७१ मध्ये करण्यात आलेल्या या कायद्यामुळे काही संपूर्ण जाती-जमातींना त्यांच्या वैयक्तिक कृतीवर नव्हे, तर केवळ जातीय ओळखीच्या आधारे 'गुन्हेगार' म्हणून नोंदविण्याची अमानुष व्यवस्था निर्माण झाली. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला किंवा नाही, यापेक्षा ती व्यक्ती कोणत्या समुदायात जन्माला आली आहे, याला अधिक महत्त्व देण्यात आले. हा आधुनिक न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारा प्रकार होता.

या कायद्यामुळे संपूर्ण समुदायांवर संशयाची छाया पडली. त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले, नोंदणी आणि देखरेखीच्या विविध यंत्रणा उभ्या करण्यात आल्या आणि अनेकांना तथाकथित 'सेटलमेंट'मध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या स्वातंत्र्यावर आणि उपजीविकेच्या पारंपरिक मार्गांवर निर्बंध आले. परिणामी सामाजिक कलंक, आर्थिक दारिद्र्य आणि प्रशासकीय नियंत्रण यांचे दुष्टचक्र निर्माण झाले. सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे 'गुन्हेगार' हा शिक्का व्यक्तीच्या कृतीशी जोडलेला नसून जन्माशी जोडला गेला. अशा प्रकारची जन्मजात गुन्हेगारीची कल्पना मानवी प्रतिष्ठेला नाकारणारी होती.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक इतिहासातही या समुदायांचे योगदान अनेकदा पुरेसे अधोरेखित झालेले दिसत नाही. ब्रिटिश सत्तेविरुद्ध विविध स्वरूपात प्रतिकार करणाऱ्या अनेक स्थानिक समुदायांवर ब्रिटिश प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवले. भटक्या-विमुक्त समाजातील विविध समूहांच्या इतिहासात स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अस्तित्वासाठी संघर्षाची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच या समाजाचा इतिहास केवळ दारिद्र्याचा किंवा मागासलेपणाचा इतिहास म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो प्रतिकाराचा, जिद्दीचा, सांस्कृतिक सातत्याचा आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या संघर्षाचा इतिहास आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर या ऐतिहासिक अन्यायाचे निराकरण करण्याचे आव्हान होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन 'क्रिमिनल ट्राइब्ज ॲक्ट-१८७१' रद्द करण्यात आला आणि त्या कायद्याच्या कक्षेत असलेल्या समुदायांना 'विमुक्त' म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजाच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बंधनातून मुक्ततेचे प्रतीक ठरला.

मात्र कायदा रद्द झाला म्हणून सामाजिक कलंक तात्काळ संपला नाही. कायद्याच्या पुस्तकातील 'गुन्हेगार' हा शब्द काढून टाकणे सोपे होते; पण समाजाच्या मानसिकतेतील संशय आणि पूर्वग्रह दूर करणे अधिक कठीण होते. अनेक दशकांनंतरही भटक्या-विमुक्त समाजातील काही घटकांना पोलिसी संशय, सामाजिक अविश्वास आणि भेदभावाचा सामना करावा लागल्याचे सामाजिक अभ्यासांतून आणि विविध अनुभवांतून दिसून येते. एका अन्यायकारक कायद्याने निर्माण केलेली मानसिकता पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, याची ही जाणीव करून देणारी बाब आहे.

भटक्या-विमुक्त समाजाच्या वर्तमान प्रश्नांकडे पाहिले तर शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थिर निवासाचा अभाव, वारंवार स्थलांतर, आर्थिक अस्थिरता, शाळेपासून भौगोलिक अंतर आणि कागदपत्रांची कमतरता यामुळे अनेक मुलांना सातत्याने शिक्षण घेणे कठीण जाते. एखादे मूल शाळेत दाखल झाले तरी कुटुंबाच्या स्थलांतरामुळे त्याचे शिक्षण खंडित होऊ शकते. त्यामुळे केवळ शाळेत प्रवेश देणे पुरेसे नाही; शिक्षणाची सातत्यपूर्णता, वसतिगृहांची उपलब्धता, शिष्यवृत्ती, शैक्षणिक मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याशी जोडलेली उपाययोजना आवश्यक आहे.

शिक्षणाबरोबरच निवासाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. स्थिर घर हे केवळ निवाऱ्याचे साधन नसून शिक्षण, आरोग्य, मतदानाचा हक्क, सरकारी योजना, बँकिंग, रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता यांच्याशी जोडलेले असते. ज्यांच्याकडे स्थिर पत्ता नाही, त्यांच्यासाठी अनेक शासकीय प्रक्रियाच कठीण होतात. जन्मनोंदणी, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आधारसारखी ओळखपत्रे, शिधापत्रिका आणि इतर कागदपत्रे मिळविण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींमुळे योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे 'कागदपत्रे' हा केवळ प्रशासकीय विषय नसून सामाजिक समावेशनाचा मूलभूत प्रश्न आहे.

रोजगाराच्या बाबतीतही भटक्या-विमुक्त समाजासमोर मोठी आव्हाने आहेत. पारंपरिक व्यवसायांमध्ये आधुनिक बाजारपेठेतील बदलांमुळे उत्पन्नाच्या संधी कमी झाल्या आहेत. अनेक पारंपरिक कला आणि कौशल्ये आधुनिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली नाहीत तर ती पुढील पिढ्यांपर्यंत टिकणे कठीण होईल. त्यामुळे पारंपरिक कौशल्यांचे जतन करताना त्यांचे आधुनिक कौशल्यविकास, बाजारपेठ, डिजिटल माध्यमे, सहकारी संस्था आणि उद्योजकतेशी नाते जोडणे आवश्यक आहे. समाजातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक व्यापक होऊ शकतो.

महिलांच्या प्रश्नांकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्त समाजातील महिलांना गरिबी, अस्थिर उपजीविका, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक अडचणी आणि सामाजिक असुरक्षितता अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागू शकते. महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य, स्वयं-सहायता गटांची निर्मिती, कौशल्यविकास, आर्थिक साक्षरता, सुरक्षित निवास आणि आरोग्यसेवा यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाचा खरा विकास मोजायचा असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती आणि मुलींच्या शिक्षणाच्या संधी यांचा विचार करणे अपरिहार्य आहे.

भटके-विमुक्त समाजाच्या सांस्कृतिक संपदेचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. लोककला, लोकपरंपरा, मौखिक इतिहास, लोकसंगीत, कथाकथन, हस्तकला, पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धती ही भारतीय सांस्कृतिक विविधतेची महत्त्वपूर्ण अंग आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहात या परंपरा नष्ट होऊ नयेत, यासाठी त्यांचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धन आवश्यक आहे. मात्र संस्कृतीचे संवर्धन करताना त्या समाजाला केवळ 'लोककलेचे प्रदर्शन' म्हणून पाहणे टाळले पाहिजे. त्यांच्या संस्कृतीचा आदर करण्याबरोबरच त्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.

आज संविधानिक मूल्ये भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आपल्याला महत्त्वाची दिशा देतात. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे जन्म, जात, जीवनपद्धती किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीकडे संशयाने पाहणे संविधानाच्या समतेच्या भावनेला विरोध करणारे आहे. भटके-विमुक्त समाजाचा प्रश्न हा केवळ एखाद्या विशिष्ट समाजघटकाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे 'भटके विमुक्त दिवस' म्हणून मान्य केल्यामुळे या प्रश्नांना नव्याने सामाजिक आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु कोणताही स्मृतिदिन तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्या निमित्ताने वास्तवातील प्रश्नांवर ठोस कृती होते. कार्यक्रम, भाषणे आणि गौरव सोहळे आवश्यक असले तरी त्यापलीकडे जाऊन शिक्षण, निवास, रोजगार, आरोग्य, कागदपत्रे आणि सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर परिणामकारक उपाययोजना होणे अधिक महत्त्वाचे आहे.

भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजातील संवेदनशील घटक यांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी या समाजाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, शिक्षणाचा, अर्थकारणाचा आणि सामाजिक बदलाचा शास्त्रीय अभ्यास वाढवला पाहिजे. त्यांच्या विषयी संशोधन करताना मात्र त्यांच्याकडे केवळ 'अभ्यासाचा विषय' म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवांना आणि ज्ञानाला महत्त्व देणे आवश्यक आहे.

विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना या समाजाच्या प्रश्नांशी जोडणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास भटक्या-विमुक्त समाजातील युवक केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकतात. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सांस्कृतिक वारसा आणि आर्थिक विकास यांची सांगड घालता येऊ शकते.

३१ ऑगस्टचा भटके-विमुक्त दिन आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की कायदा बदलला, पण समाजाची मानसिकता कितपत बदलली? १९५२ मध्ये कायदेशीर मुक्ती मिळाली; परंतु खरी सामाजिक मुक्ती तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा कोणत्याही मुलाला त्याच्या जन्माच्या आधारावर कमी लेखले जाणार नाही, कोणत्याही कुटुंबाला केवळ त्याच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे संशयाच्या नजरेने पाहिले जाणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या पार्श्वभूमीचा पुरावा देत राहण्याची गरज भासणार नाही. कायद्याने दिलेली समानता समाजमानसात उतरली, तरच स्वातंत्र्याचा अर्थ खऱ्या अर्थाने व्यापक होईल.

आज भटके-विमुक्त समाजाकडे दयेच्या नजरेने पाहण्याची नव्हे, तर समानतेच्या आणि सन्मानाच्या नजरेने पाहण्याची गरज आहे. त्यांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या चौकटीतून न पाहता सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीतून पाहिले पाहिजे. 'त्यांच्यासाठी काय करता येईल?' या प्रश्नाबरोबरच 'त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी कसे करून घेता येईल?' हा प्रश्नही विचारला पाहिजे. त्यांच्या नेतृत्वाला, अनुभवांना आणि ज्ञानाला विकासाच्या प्रक्रियेत स्थान मिळाले पाहिजे.

३१ ऑगस्ट हा दिवस म्हणून साजरा करताना १९५२ च्या मुक्तीची आठवण ठेवणे आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या अदृश्य बंधनांचीही जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणाचा अभाव, भूमिहीनता, अस्थिर निवास, बेरोजगारी, कागदपत्रांचा प्रश्न, आरोग्याच्या सुविधा, सामाजिक पूर्वग्रह आणि आर्थिक असुरक्षितता ही आजची आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संवेदनशील धोरणांची आवश्यकता आहे. खऱ्या अर्थाने भटके-विमुक्त दिन साजरा करायचा असेल तर त्या दिवशी केवळ इतिहासाचे स्मरण न करता भविष्याचा संकल्प करावा लागेल. प्रत्येक भटक्या-विमुक्त मुलाला दर्जेदार शिक्षण, प्रत्येक कुटुंबाला सन्मानजनक निवास, प्रत्येक युवकाला कौशल्य व रोजगाराची संधी, प्रत्येक महिलेला सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन, प्रत्येक नागरिकाला आवश्यक कागदपत्रे आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेली समान प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प करावा लागेल. हीच त्या ऐतिहासिक मुक्तीची खरी फलश्रुती ठरेल.

भटक्या-विमुक्त समाजाची कहाणी ही केवळ एका समाजाची कहाणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाची कहाणी आहे. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी एका अन्यायकारक कायद्याची समाप्ती झाली; आता ३१ ऑगस्ट हा दिवस सामाजिक पूर्वग्रह, भेदभाव आणि वंचिततेच्या अदृश्य भिंती मोडण्याच्या नव्या संकल्पाचा दिवस झाला पाहिजे. कायद्याने दिलेली मुक्ती सामाजिक सन्मानात आणि आर्थिक स्वावलंबनात रूपांतरित झाली, तरच 'विमुक्त' ही संज्ञा केवळ इतिहासाची आठवण न राहता वर्तमानाची जिवंत वास्तवता बनेल. म्हणूनच भटके-विमुक्त दिनाचा संदेश स्पष्ट आहे की मुक्ती केवळ बंधनांतून बाहेर पडण्यात नाही; तर समान संधी, सन्मान, स्वाभिमान आणि न्यायासह समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठेने उभे राहण्यात आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)* ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

# एटीएम मशिनमध्ये छेडछाड करून पैसे काढणाऱ्या बिहारमधील चौघांना अटक

■धावत्या एक्स्प्रेसमध्ये शोध घेऊन आंतरराज्यीय टोळीला पकडले
■कोळसेवाडी पोलिसांची कारवाई

कल्याण : एटीएम मशिनमध्ये छेडछाड करून बेकायदेशीरपणे पैसे काढणाऱ्या एका कथित आंतरराज्यीय टोळीतील चार जणांना कोळसेवाडी पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींचे पूर्ण नाव किंवा फोटो उपलब्ध नसतानाही पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या एका आरोपीकडून मिळालेल्या मर्यादित माहितीच्या आधारे भिवंडी ते कसारा रेल्वे स्थानकापर्यंत शोधमोहीम राबवून फरार असलेल्या तिघांना धावत्या एक्स्प्रेसमधून पकडण्यात यश मिळविले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ ऑगस्ट रोजी पोलीस उपनिरीक्षक जे. डी. सापटे यांच्यासह पोलीस कर्मचारी कर्तव्यावर असताना खास खबर्याकडून काही संशयित इसम एटीएम मशिनमध्ये छेडछाड करून पैसे काढत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि एका संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपल्यासोबत आणखी तीन साथीदार असल्याचे सांगितले. हे तिघे घटनास्थळावरून पसार झाले होते. त्यानंतर पोलिसांनी आरोपीने दिलेल्या माहितीच्या आधारे भिवंडीतील कोनगाव परिसरात त्यांचा शोध घेतला. मात्र, तेथूनही आरोपी पसार झाले होते.

यानंतर पोलिसांनी भिवंडीपासून कसारा रेल्वे स्थानकापर्यंत आरोपींचा शोध सुरू केला. आरोपींचे फोटो किंवा संपूर्ण नावे उपलब्ध नसतानाही ताब्यातील आरोपीकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू ठेवण्यात आला. अखेर धावत्या एक्स्प्रेस रेल्वेमध्ये शोध घेऊन फरार तिघांनाही ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये राजेशकुमार रामलालप्रसाद यादव (३१), हरीराम कुमार उमेश सिंह (२५), रोहितकुमार बिनोद सिंह (२६) आणि सुदीपकुमार सुरेंद्र विश्वकर्मा उर्फ



सुरदीप (२६) यांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी मूळचे बिहारचे असून सध्या भिवंडीतील कोनगाव परिसरात राहत होते. चारही आरोपींना कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आणून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. या टोळीने यापूर्वी अन्य एटीएम मशिनमध्ये अशाच प्रकारे छेडछाड करून किती रक्कम काढली आहे, याचाही पोलीस तपास करीत आहेत.

# मंगळागौर स्पर्धेतून संस्कृतीचा सोहळा व नारीशक्तीचा जागर : महापौर सुजाता पाटील

**नवी मुंबई: एकटी व्यक्ती आनंदी होऊ शकते मात्र एकजुटीने आनंदासोबतच परिवर्तन घडू शकते असे सांगत नवी मुंबईच्या महापौर श्रीम.सुजाता पाटील यांनी मंगळागौर स्पर्धा हे एकत्र येण्याचे माध्यम असल्याचे मत व्यक्त केले. मंगळागौर हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा सोहळा आहे, या माध्यमातून नारीशक्तीचा जागर होतो असे सांगत या स्पर्धेत सहभागी होणा–या महिला या संस्कृती जोपसाणा–या दूत आहेत अशा शब्दात महापौर महोदयांनी गौरव केला. नवी मुंबई महानगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या वतीने वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजित महिला मेळाव्यानिमित्त त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या.**



महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना व उपक्रम राबवित नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे सांगून महापौर महोदयांनी आता एनएमएमटी बसेसमध्ये चालकही महिलाच असतील असे सांगितले. त्यादृष्टीने महिलांना चार चाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणारी योजना महासभेत मंजूर केली असल्याचे सांगून मा.मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील एकल महिलांसाठीच्या योजनांकरिताही नोंदणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी महापौर श्रीम.सुजाता पाटील यांचेसमवेत बेलापूर विधानसभा सदस्य आमदार श्रीम. मंदाताई म्हात्रे, सभागृह नेते श्री.सागर नाईक, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीम. सलुजा सुतार, फ प्रभाग समिती सभापती श्रीम. ललिता मढवी, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ, नगरसेवक श्री.जयवंत सुतार, नगरसेविका श्रीम.अंजनी भोईर, श्रीम. स्वाती गुरखे, श्रीम.शशिकला पाटील, श्रीम.दयावती शेवाळे, ड. भारती पाटील, श्रीम. मिरा पाटील, श्रीम.संतोषी म्हात्रे, श्रीम. अंजना म्हात्रे, श्रीम.प्रिती भगत, श्रीम. शिल्पा ठाकूर, श्रीम. श्रेया जिरगे, श्रीम.मिनाक्षी पाटील, श्रीम.वैष्णवी नाईक, श्रीम. माधुरी सुतार, श्रीम. अंजली वाळुंज, श्रीम. प्रतिक्षा पाटील, श्रीम.रेश्मा मढवी, माजी नगरसेविका श्रीम. उषा भोईर, श्रीम. शिल्पा कांबळी, श्रीम. संगीता म्हात्रे, श्रीम.मोनिका पाटील, समाजविकास विभागाचे उपआयुक्त श्री.प्रकाश कांबळे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

बेलापूर विधानसभा सदस्य आ.श्रीम.मंदाताई म्हात्रे यांनी मंगळागौर स्पर्धेच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीचे जतन होते असे सांगत सर्वांच्या एकत्र येण्याने



हा कार्यक्रम आनंदोत्सव झाला असे मत व्यक्त केले. महिलांसाठी महानगरपालिका करीत असलेल्या योजनांची लवकरात लवकर प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी असेही त्यांनी सांगितले.

सभागृह नेते श्री.सागर नाईक यांनी नवी मुंबई हे परस्पर प्रेमभाव जपणारे कुटुंब असल्याचे सांगत येथील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी नवी मुंबई महानगरपालिका कटिबध्द असल्याचे मत मांडले. मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतील लखपती दिदी योजना यशस्वीपणे राबविण्याकडे विशेष लक्ष देण्यात येत असल्याचे सांगत मंगळागौर स्पर्धेच्या माध्यमातून परंपरेचा संस्कार जपत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

महिला व बालकल्याण समितीच्या सभापती श्रीम.सलुजा सुतार यांनी प्रास्ताविकपर मनोगतात महिला व बालकल्याण समितीमार्फत विविध २० प्रकारच्या योजना आणि उपक्रम राबविले जात असल्याची माहिती देत महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंसाठी विक्री केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी ठोस प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. यादृष्टीने दिवाळीच्या आधी बचतगटांनी उत्पादित केलेल्या साहित्य विक्रीसाठी महोत्सव आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी जीवन आधार फाऊंडेशनच्या संस्थापक ॲड. रेखा चिरनेरकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात महिलांनी आपल्यातील कौशल्ये ओळखून त्याचे रूपांतर रोजगारामध्ये कसे होईल याकडे लक्ष द्यायला हवे असे सांगत उत्पादित वस्तूंच्या विक्रीसाठी एकत्र यावे तसेच समाज माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करावा असे आवाहन केले.


- **मंगळागौर स्पर्धेमध्ये रूचिरा ग्रूप ऐरोली यांनी प्रथम क्रमांक तसेच नारीशक्ती मंगळागौर समुह नेरूळ यांनी व्दितीय आणि वाशीचा राजा महिला बचत गट वाशी यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. आदिशक्ती ग्रूप ऐरोली आणि नुतन एकता महिला मंडळ बेलापूर या महिला समुहांनी उत्तेजनार्थ पारितोषिके पटकावली.**
- **अंतिम फेरीत स्थान मिळविलेल्या राधेश्याम महिला मंडळ तुर्भे, धनलक्ष्मी महिला मंडळ कोपरखैरणे, संस्कृतीची शान समुह घणसोली, नव्या फाऊंडेशन घणसोली व नृत्य इल्यूजन डान्स स्टुडिओ नेरूळ या ५ नृत्यसमुहांना उल्लेखनीय सादरीकरणाबद्दल सन्मानीत करण्यात आले.**
- **नामवंत नृत्य कलावंत श्री.अशिमिक कामठे आणि आणि श्रीम. आरती पानसरे यांनी मंगळागौर स्पर्धेचे परीक्षण केले.**
- **मंगळागौर स्पर्धेत नमुंमपा क्षेत्रातील ३२ महिला समुहांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतून १० समुहांची अंतिम फेरीत निवड करण्यात आली.**
- **याप्रसंगी ६५ महिला बचत गट व महिला मंडळे यांनी उत्पादित केलेल्या साहित्याचे स्टॉल्स लावण्यात आले होते.**

# निर्माणाधिन इमारतीवरून लोखंडी रॉड बैठ्या चाळीचा पत्रा फोडून थेट स्वयंपाकघरात

ठाणेः मानपाडा येथे रूणवाल बिल्डर्सच्या निर्माणाधिन इमारतीवरून एक लोखंडी रॉड बैठ्या चाळीचा पत्रा फोडून थेट स्वयंपाकघरात पडला. मात्र, त्यावेळी स्वयंपाकघरात कोणी नसल्याने जीवितहानी घडली नाही. दरम्यान, असा प्रकार चार वेळा घडला असल्याने या प्रकरणी रूणवाल बिल्डरवरच गुन्हा दाखल करावा; सदर बांधकाम पूर्णतः बंद करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी केली आहे.

या घटनेबाबत राष्ट्रवादी काँग्रेस–शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ते म्हणाले , चितळसर मानपाडा नाक्यानजीकच्या पेट्रोल पंप जवळ २५ अवर्स रुणवाल बिल्डरचा मोठा प्रकल्प सुरू आहे. येथे ५० मजल्याच्या इमारती तिथे बांधल्या जात आहेत. आज चौथ्यांदा तिथे एक दुर्घटना घडली आहे. निर्माणाधिन इमारतीतून एक मोठा लोखंडी रॉड करण तट्टे यांच्या बैठ्या घराच्या स्वयंपाकघरात येऊन कोसळला. हा एकदा झालेला प्रकार नाही, हा गेल्या सहा महिन्यात चौथा प्रकार आहे. ह्या वेळेस त्यांना माफ करू नये. आम्ही ताबडतोप पोलीस स्टेशनला त्या घरातील लोकांना जायला सांगितले असून आमचे कार्यकर्तेही त्या पोलीस स्टेशनमध्ये पोहचले आहेत.

एकदा झाले तर मानवी चूक आपण समजू शकतो; पण, हे चौथ्यांदा झाले आहे. म्हणजे तुम्ही सुरक्षेचे नियम पाळले जात नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. महत्वाचे म्हणजे, मी पोलिसांना सांगतोय की दरवेळेस अशी काही घटना घडली तर कुठल्यातरी कॉन्ट्रॅक्टरवर किंवा कॉन्ट्रॅक्टरच्या



माणसावर गुन्हा दाखल केला जातो, पण ह्या वेळेस गुन्हा थेट रुणवालवर दाखल झाला पाहिजे. तसेच, अशा प्रकारचं काम जागीच थांबला पाहिजे आणि रुणवाललाच नाही तर हा इशारा मी ठाण्यातील सगळ्या बिल्डर्सना देतो की, अशा प्रकारची कुठलीही घटना झाली तर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते जागेवर जाऊन तुमचं काम थांबवतील.

# कल्याणमध्ये एसटी चालकाची दादागिरी

## सायरन वाजवत असलेल्या रुग्णवाहिकेला १५ मिनिटे रोखले

कल्याण : कल्याण–मुरबाड मार्गावरील शहाड उड्डाणपुलाजवळ मानवतेला काळिमा फासणारी आणि अत्यंत गैरजबाबदार घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. विठ्ठलवाडी आगाराच्या एसटी बसच्या चालक आणि वाहकाने सायरन वाजवत असलेल्या रुग्णवाहिकेला रस्ता न दिल्याने रुग्णवाहिका तब्बल १५ मिनिटे वाहतूक कोंडीत अडकून पडली.

मिळालेल्या माहितीनुसार, बस चालक प्रवाशांना बसमध्ये चढवत होता. त्याचवेळी मागून आलेली रुग्णवाहिका सातत्याने सायरन आणि हॉर्न वाजवत होती. उपस्थित नागरिकांनी चालकाला बस थोडी बाजूला घेण्याची विनंती केली. मात्र, चालकाने उलट नागरिकांशी वाद घालण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे.

चालकाने कथितरित्या, मी पॅसेंजर भरत आहे, तुला जे करायचे ते कर. माझी गाडी बाजूला आहे, बसस्टॉपवर उभी आहे. त्या बाजूने रस्ता मोकळा आहे, असे म्हटल्याचे सांगण्यात येत आहे.



या वेळी उपस्थित नागरिक तसेच घटनेचे व्हिडिओ चित्रीकरण करणाऱ्या पत्रकारांशीही चालक आणि वाहकाने हुज्जत घातल्याचा आरोप आहे. रुग्णवाहिकेत रुग्ण असतानाही त्याला तातडीने मार्ग देण्यात आला नाही, यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला.

अखेर घटनास्थळी नागरिकांचा रोष वाढताच चालकाला बस हटवावी लागली आणि त्यानंतर रुग्णवाहिकेला पुढे जाण्यासाठी मार्ग मिळाला.




ज्ञानदीप सेवा मंडळाची प्राथमिक शाळा करावे गाव, इयत्ता सातवी आरएसपी यूनिट ने नेक्सस सीवूड्स मॉल येथे रस्ता सुरक्षा पथनाट्य सादर केले. थनाट्यातून सिग्नल पालन, हेल्मेट, सीटबेल्ट, वेग नियंत्रण याद्वारे स्वतःची आणि इतरांची सुरक्षा राखण्याचे सादरीकरण केले. या प्रसंगी डॉ. राहुल खाडे (पोलीस उपायुक्त वाहतूक विभाग) आणि सौ. मोहिनी लोखंडे (वरिष्ठ निरीक्षक वाहतूक पोलीस) यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा गुणगौरव केला. सर्वोदय स्मॉल फाइनेंस तर्फे विद्यार्थ्यांना भेटवस्तू आणि नेक्सस मॉल तर्फे नाश्ता पुरविण्यात आला. मुख्याध्यापक श्री बंकट तांडेल यांच्या मार्गदर्शनाखाली आरएसपी शिक्षक श्री. हरेश तांडेल आणि सहकारी शिक्षकांनी या कार्यक्रमाची धुरा सांभाळली.

# मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनानिमित्त कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये "राष्ट्रीय क्रीडा दिन" साजरा

कल्याणः केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या निर्देशानुसार मा शिक्षण संचालक तसेच मा शिक्षण अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांचे सुचनेनुसार महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील महानगरपालिका शाळांमध्ये तसेच सर्व व्यवस्थापनाच्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये 'राष्ट्रीय क्रीडा दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

यावर्षी भारत सरकारच्या युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या 'फिट इंडिया चळवळी अंतर्गत खेलेगा भारत, जीतेगा भारत या संकल्पनेखाली दिनांक २८ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत तीन दिवसीय देशव्यापी अभियान आयोजित करण्यात आले आहे.

भारतीय खेळ प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सदर तीन दिवसीय अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये खालीलप्रमाणे दिनांक २८ ते ३० या कालावधीत विविध क्रीडा विषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे

दिनांक २८ ऑगस्ट २०२६– आदर व लोकसहभागः सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून,'फिट इंडिया



तंदुरुस्ती प्रतिज्ञा देण्यात आली.
२. विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर २९ चॅलेंज, 'पास द बॉल' आणि 'स्पोर्ट्स बंधन यांसारख्या क्रीडा आव्हानांचे आयोजन करणे,राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या संकल्पनेवर आधारित निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि पोस्टर मेकिंग स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले.
२. दिनांक २९ ऑगस्ट २०२६ (शनिवार) – खेळ – मुख्य क्रीडा दिवस एक घंटा खेल के मैदान में : या मुख्य दिवशी राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनिवार्यपणे मैदानावर उतरून किमान एक तास आवडीचे खेळ खेळणे बंधनकारक करण्यात आलेले होते त्यानुसार सर्व शाळांमध्ये विविध खेळांचे आयोजन करण्यात आले .
३. शाळांमध्ये 'वर्ग विरुद्ध वर्ग किंवा 'शिक्षक विरुद्ध विद्यार्थी असे व्हॉलीबॉल, खो–खो, कबड्डी, लगोरी आणि लेझिम यांसारख्या पारंपरिक व देशी खेळांचे मैत्रीपूर्ण सामने आयोजित करणे.या दिवशी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी अनिवार्यपणे क्रीडा पोशाख परिधान केलेला होता.
३. दिनांक ३० ऑगस्ट २०२६ गतिशीलताः स्थानिक स्तरावर विद्यार्थी, एनसीसी आणि एनएसएस स्वयंसेवकांच्या मदतीने 'संडेज् ऑन सायकल' अंतर्गत सायकल रॅली, प्रभात फेऱ्या किंवा वॉकथॉनचे आयोजन करणेबाबत महाविद्यालय शाळा स्तरांवर नियोजन करण्यात आले होते.

# नवसाहित्यिक निर्मितीसाठी मराठी वाङमय मंडळ ही काळाची गरज

## कथाकार भिकू बारस्कर यांचे प्रतिपादन




कल्याण: तरुण पिढीने समृद्ध मराठी भाषेचा विस्तार करण्यासाठी संभाषणातून मराठी भाषा जिवंत ठेवावी. अखंडीत वाचनातून दर्जे दार लेखन करून नवसाहित्यिक निर्मितीसाठी मराठी वाङमय मंडळ ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन कथाकार भिकू बारस्कर यांनी ज.ए.इ. चे महिला महाविद्यालय, मराठी विभाग आयोजित मराठी वाङ्:मय मंडळ उद्घाटनप्रसंगी केले. ज्या शाळेत शिक्षण घेतले त्याच शाळेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचा बहुमान या मराठी भाषेमुळे मला मिळाला असल्याचा आनंद त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

प्रसंगी विद्यार्थ्यांनी निसर्गाचे विविध अविष्कार दाखविणाऱ्या अनेक विषयावरील कवितांचे सादरीकरण केले. व्यासपीठावर हिरकणी डॉ. राजश्री बोहरा (भारतीय मराठी साहित्य परिषद, मुंबई प्रदेश), आदिती चौधरी (समन्वयक–सिक्कीम मणिपाल विद्यापीठ,संचालक आयुष अकॅडमी), साहित्य परिषद, डोंबिवली शाखा), प्रा.डॉ.सुनील पवार मराठी विभाग प्रमुख, डॉ. सुनील घाडगे (प्राचार्य प्रभारी) , विद्यार्थीगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. काव्यमय वातावरणात मराठी वाड्:मय मंडळाचे उदघाटन संपन्न झाले.

# श्रीवर्धन शहरात माकडांचा वाढता उपद्रव

## बागायती पिकांचे मोठे नुकसान

**वृक्षतोड, शासकीय जमिनी अतिक्रमण | बांधकामाकडे वन विभागाचे दुर्लक्ष? | नागरिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर**

श्रीवर्धनः श्रीवर्धन शहर व परिसरात गेल्या काही काळापासून माकडांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून, शहरातील बागायती क्षेत्रांमध्ये घुसून माकडांकडून केळी, नारळ, पपई तसेच इतर शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात असल्याची तक्रार नागरिकांकडून होत आहे. या उपद्रवामुळे कष्टाने उभी केलेली पिके वाया जात असून, छोट्या बागायती क्षेत्रावर उदरनिर्वाह करणाऱ्या नागरिकांसमोर आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत.

श्रीवर्धन परिसरात पूर्वी मोठ्या प्रमाणात नैसर्गिक वनसंपदा आणि झाडाझुडपांचे क्षेत्र होते. मात्र, गेल्या काही वर्षांत विविध कारणांमुळे वृक्षतोड, शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे आणि वनक्षेत्रात होणारे बदल यामुळे वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. जंगल व झाडांची संख्या कमी होत गेल्याने अन्न आणि सुरक्षित अधिवासाच्या शोधात माकडांसह इतर वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेषतः शहरालगतच्या बागायती क्षेत्रात माकडांचे कळप येऊन पिकांचे नुकसान करीत आहेत. केळी, पपई, नारळ यांसारख्या पिकांबरोबरच घरांच्या परिसरातील झाडांनाही तसेच घरांचे पत्रे याचे माकडांकडून नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी व बागायतदारांनी केलेला खर्च, मेहनत आणि अपेक्षित उत्पन्न धोक्यात आले आहे. पिकांचे नुकसान झाले तर त्याची भरपाई कोण देणार? असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील काही भागांत मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याच्या तक्रारी असून, शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून नैसर्गिक झाडांची तोड केली जात असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. अशा प्रकारांना वेळीच आळा घातला नाही तर वनक्षेत्र कमी होऊन वन्यप्राण्यांचा अधिवास आणखी संकुचित होण्याची शक्यता आहे.

शासकीय जमीन, वनक्षेत्र किंवा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागात होणाऱ्या अतिक्रमण व वृक्षतोडीवर संबंधित यंत्रणांनी नियमित पाहणी



करून कायद्यानुसार कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र, अनेक ठिकाणी तक्रारी करूनही अपेक्षित पातळीवर कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

विकासकामे, बांधकामे किंवा इतर कारणांसाठी वृक्षतोड अथवा जमिनीचा वापर बदलास परवानगी देताना संबंधित परिसरातील वनसंपदा, जैवविविधता आणि वन्यजीवांचा अधिवास यांचाही विचार होणे गरजेचे आहे. केवळ मानवी वस्ती आणि विकासाचा विचार न करता, वन्यजीवांसाठी उपलब्ध असलेला नैसर्गिक अधिवास किती शिल्लक राहणार आहे, याचाही पर्यावरणीय दृष्टिकोनातून विचार होणे आवश्यक असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे.

**वन विभागाने ठोस उपाययोजना करण्याची मागणी**

माकडांचा वाढता उपद्रव ही केवळ नागरिकांच्या पिकांच्या नुकसानीची बाब नसून, त्यामागे बदलत चाललेले पर्यावरण आणि वन्यजीवांचा कमी होत चाललेला नैसर्गिक अधिवास हेही महत्त्वाचे कारण असू शकते. त्यामुळे वन विभागाने श्रीवर्धन शहर व तालुक्यातील संवेदनशील भागांची पाहणी करून वृक्षतोड, अतिक्रमण आणि वनक्षेत्रातील अनधिकृत हस्तक्षेपावर कठोर नियंत्रण ठेवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# जीवनदीप महाविद्यालयाचा २२ वा वर्धापन दिन उत्साहात



कल्याण : जीवनदीप शैक्षणिक संस्थेचा २२ वा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात शनिवारी संपन्न झाला. या संस्थेचा पाया रविंद्र घोडविंदे यांनी रचला. या संस्थेत अनेक ज्ञानशाखा, कौशल्य विकास कोर्स, शिक्षकांच्या तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त असे कोर्स सुरू आहेत.

यावेळी जेष्ठ पत्रकार सरिता कौशिक, आमदार किसन कथोरे, केडीएमसी महापौर हर्षाली चौधरी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकेश ढगे, दृष्टी मित्र साकिब गोरे, अनंता शिसवे, आशिष काटकर, शेखर लोणे यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ यांनी करत महाविद्यालयाची वाटचाल सर्वांपुढे त्यांनी मांडली.

आमदार किसन कथोरे यांचे नेहमी संस्थेच्या यशामागे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांनी या महाविद्यालयाच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणासाठीची दारे खुली झाली व मुली शिकू लागल्या असे उद्गार काढले. सर्वच प्रमुख अतिथी मान्यवरांनी महाविद्यालयाचे या यशस्वी कारकिर्दीचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. परिसरातील कर्तृत्ववान व्यक्ती तसेच गुणवंत विद्यार्थी यांचा देखील या प्रसंगी गुणगौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे, प्रा. नरेश टेंभे यांनी केले.

# गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानातील कामांना नव्या 'टाइमलाईन'ने गती द्या : मुख्यमंत्री



## विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याचा विकास व्हावा
## आफ्रिकन सफारीच्या कामाचाही घेतला आढावा; सल्लागार नियुक्त करण्याचे निर्देश

*नागपूर : हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पाची पाहणी करून विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती, प्रकल्पाची प्रगती आणि सफारी सुरू करण्याचे अपेक्षित वेळापत्रक याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. गोरेवाड्यात सुरू असलेल्या सर्व कामांसाठी नव्याने स्पष्ट कालमर्यादा निश्चित करून त्यानुसार कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.*



### गोरेवाडा प्राणी उद्यानाची पाहणी

"मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी प्रकल्पातील विविध सुविधांची आणि सुरू असलेल्या कामांची माहिती त्यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

१ प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात ट्रेल ऑफ सेन्सेस, बायोपार्क, नाईट झू, गोंडवाना पार्क, बायो डिस्कव्हरी प्लाझा आणि ट्रायबल ट्रेल यांचा समावेश असल्याची माहिती सादरीकरणात देण्यात आली. या विविध सुविधांच्या माध्यमातून गोरेवाडा प्रकल्पाचा वन्यजीव पर्यटनासोबतच जैवविविधता, निसर्ग आणि स्थानिक संस्कृतीचा अनुभव देणारे महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची संकल्पना मांडण्यात आली.

२ प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी अनुभवी आणि सक्षम सल्लागाराची नियुक्ती करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. गोरेवाड्याचा विकास करताना दीर्घकालीन पर्यटनाच्या गरजा लक्षात घेऊन नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

३ ताडोबा आणि पेंच येथे येणाऱ्या पर्यटकांनी गोरेवाड्यात एक ते दोन दिवस पर्यटनासाठी घालवावेत, या दृष्टीने गोरेवाड्याचा विकास करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ताडोबा आणि गोरेवाडा या दोन्ही पर्यटनस्थळांना जोडणारे प्रभावी नियोजन करून पर्यटकांचा मुक्काम वाढेल, अशा पद्धतीने सुविधा विकसित करण्याची सूचना त्यांनी केली.

४ गोरेवाडा प्रकल्पात वन्यजीव पर्यटनासोबत पर्यटकांना विविध अनुभव देणाऱ्या सुविधा विकसित करून विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याची ओळख निर्माण करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

गोरेवाडा येथील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील वसंतराव नाईक प्रशासकीय इमारतीत आज आयोजित आढावा बैठकीला वनमंत्री गणेश नाईक, खासदार माया इनवाते, वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक(वनबल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस अधीक्षक ग्रामीण हर्ष पोद्दार, वाईल्डलाइफ रेस्क्यू व ट्रेनिंग सेंटरचे संचालक शिरीष उपाध्ये, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, विभागीय व्यवस्थापक तथा प्राणीसंग्रहालय संचालक पांडुरंग पाखले यांच्यासह वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पातील विविध कामांची माहिती घेताना संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आफ्रिकन सफारी हा गोरेवाडा प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आणि अन्य कामांची पूर्तता कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती त्यांनी जाणून घेतली. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली कामे निश्चित करून त्यांची पूर्तता कालबद्ध पद्धतीने करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले. वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी गोरेवाडा प्रकल्पाची आतापर्यंतची वाटचाल, प्रकल्पाची सद्यस्थिती आणि सुरू असलेल्या विविध कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. सादरीकरणात देण्यात आलेल्या माहितीनुसार, गोरेवाडा प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आला आहे. या टप्प्यात वाइल्डलाइफ रेस्क्यू सेंटर, इंडियन सफारी आणि एंट्रन्स प्लाझा यांचा समावेश आहे.

पहिल्या टप्प्यातील ही कामे पूर्ण झाल्यानंतर गोरेवाडा प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील विविध सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे.

# योगाला शिक्षण, रोजगार आणि राष्ट्र उभारणीशी जोडावे : जिष्णु देव वर्मा

## स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाला राज्यपालांची उपस्थिती

**पुणे :** भारताच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात पात्र योग शिक्षक अथवा प्रशिक्षकाचे स्वतंत्र पद निर्माण केले पाहिजे. यामुळे युवकांच्या आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासासोबतच प्रशिक्षित योग व्यावसायिकांसाठी रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्रबंधक परिषदेच्या सदस्या पुष्पा मांडके उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, भारताकडे युवा शक्ती मोठ्या प्रमाणात असून त्याचा योग्य वापर केल्यास तो देशाचा सर्वात मोठा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश ठरू शकतो. योगामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शारीरिक तंदुरुस्ती, भावनिक संतुलन आणि आत्मजागरूकता वाढण्यास मदत होईल. त्यामुळे योग हा केवळ अधूनमधून केला जाणारा उपक्रम न राहता शिक्षणव्यवस्थेचा नियमित भाग झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. योगाच्या माध्यमातून जागतिक योग व वेलनेस अर्थव्यवस्था उभारण्याची भारताला मोठी संधी आहे. योग पर्यटन, प्रशिक्षण, संशोधन, डिजिटल व्यासपीठे, उपकरणे, वस्त्रे आणि विविध सेवांच्या माध्यमातून एमएसएमई, स्टार्टअप, महिला उद्योजक, कारागीर व स्थानिक समुदायांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होऊ शकतात. योगाच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत @२०४७'च्या उद्दिष्टांना चालना देता येईल, असे राज्यपालांनी नमूद केले.

राज्यपाल म्हणाले, कैवल्यधाम ही केवळ योग संस्था नसून भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेला आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड देणारी संस्था आहे. स्वामी कुवलयानंद यांनी १९२४ मध्ये कैवल्यधामची स्थापना करून योगाच्या वैज्ञानिक अभ्यास आणि संशोधनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांनी सुरू केलेले 'योग मीमांसा' हे नियतकालिक आजही प्रकाशित होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कैवल्यधामने राज्यातील विद्यापीठांशी शैक्षणिक भागीदारी करावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. योग अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षकांना प्रशिक्षण व प्रमाणपत्र देणे, संशोधन करणे आणि विद्यार्थी जीवनात योगाचा समावेश करण्यासाठी कैवल्यधामने विद्यापीठांना सहकार्य करावे. तसेच भारतासह जगभरात आपली केंद्रे विस्तारावीत आणि देशातील इतर जुन्या योग संस्थांना सोबत घेऊन राष्ट्रीय पातळीवर कार्य करावे, असे आवाहनही राज्यपाल वर्मा यांनी केले. यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनीही योगाच्या माध्यमातून शांततेचा संदेश जगभर पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. स्वामी कुवलयानंदजींच्या पत्रांचे पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. या पत्रांमधून तरुण विद्यार्थ्यांना जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आणि प्रगतीचा मार्ग समजण्यास मदत होईल, असे प्रभू यांनी सांगितले.




कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी यांनी प्रास्ताविक केले. कैवल्यधामच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली. यावेळी विद्यार्थी, कैवल्यधाम परिवारातील सदस्य तसेच आयएनएस शिवाजीचे अधिकारी उपस्थित होते.

# टाकळीवाडी येथे गॅस वाहिनीला गळती

## प्रशासनाकडून उपायोजना सुरु; वाहतूक धुळे - सोलापूर महामार्गावरून वळवली

**छत्रपती संभाजीनगर :** समृद्धी महामार्गालगत टाकळीवाडी (ता. गंगापूर) येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली असून खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यानची (३० किमी अंतर-हडस पिंपळ गाव ते माळीवाडा) वाहतूक धुळे – सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी कळविले आहे.

आज सायं. ५ वा. सुमारास टाकळीवाडी येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली. या घटनेची प्रशासनाने तात्काळ दखल घेत, त्वरित उपाययोजना सुरु केल्या. घटनास्थळी तात्काळ गेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना पाचरण करण्यात आले. तसेच अग्निशमन यंत्रणा सज्ज करण्यात आली.

तथापी, खबरदारी म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यान ३० किमी वरील वाहतूक धुळे – सोलापूर महामार्गावरून वळवण्यात आली आहे. मुंबईकडून जाणारी वाहने हे हडस पिंपळगाव इंटरचेंजवरून उतरून धुळे – सोलापूर महामार्गावर जातील व माळीवाडा येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. नागपूरकडून येणारी वाहने माळीवाडा इंटरचेंजवरून धुळे – सोलापूर महामार्गावर येतील व हडस पिपंळगाव येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील.

रहदारी धुळे – सोलापूर महामार्ग वरून वळविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सांगितले. दरम्यान गेल कंपनीच्या तज्ज्ञांनी दोन्हीही बाजूकडील व्हॉलव्ह बंद केले असून पाईपलाईन मधील दाब कमी होत आहे. लवकरच रहदारी सुरळीत होईल, यासाठी प्रशासन अथक प्रयत्न करीत असून जिल्हाधिकारी व पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी लक्ष ठेवून आहेत. अधिक माहितीसाठी समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्ष क्रमांक 1800 233 22 33 व 8181818155 वर संपर्क साधता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

# रत्नागिरीत २,१५९ कोटींची ऐतिहासिक गुंतवणूक

## ■ 'जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६' मध्ये पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांची माहिती

**रत्नागिरी :** कोकणात उद्योग येत नाहीत हा जुना ठपका पुसून काढत रत्नागिरीच्या स्थानिक उद्योजकांनी औद्योगिक आणि पर्यटन विकासाला नवी गती दिली आहे. 'जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६' च्या माध्यमातून जिल्ह्यात तब्बल २ हजार १५९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये रत्नागिरीच्या पर्यटन वैभवात भर घालणाऱ्या १०० कोटींच्या पंचतारांकित हॉटेल प्रकल्पासह मोठ्या औद्योगिक प्रकल्पांचा समावेश आहे.

**एक्सप्रेस ग्रुप उभारणार पंचतारांकित हॉटेल; जयगडमधील हॉटेलही सज्ज**

जिल्ह्यातील पर्यटन आणि आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) क्षेत्राला बळ देण्यासाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या:

### पंचतारांकित हॉटेलसाठी १०० कोटींची गुंतवणूक




एक्सप्रेस ग्रुपची १०० कोटींची गुंतवणूक : विमानतळापासून २ किमी, शहरापासून ३ किमी आणि समुद्रापासून अवघ्या १ किमी अंतरावर एमआयडीसीच्या जागेत एक्सप्रेस ग्रुप पंचतारांकित हॉटेल उभारणार आहे.

जयगड येथे महिंद्रांचे फाईव्ह स्टार हॉटेल : जयगड येथे उभारण्यात येत असलेल्या आनंद महिंद्रा यांच्या पंचतारांकित हॉटेलचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून ते लवकरच उद्घाटनासाठी सज्ज होत आहे.

विमानसेवा लवकरच सुरू : रत्नागिरी विमानतळाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून डिसेंबर ते जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत 'एटीआर' (ATR) प्रवासी विमान उड्डाण घेईल.

**■ स्थानिक उद्योजकांच्या बळावर औद्योगिक क्रांती**

कार्यक्रमात बोलताना उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, "रत्नागिरीचा जीडीपी गेल्या २० वर्षांच्या तुलनेत कित्येक पटीने वाढला असून, यात स्थानिक उद्योजक, व्यापारी आणि दुकानदारांचा मोठा वाटा आहे. स्थानिक उद्योजकांनी पुढाकार घेत २,१५९ कोटींची गुंतवणूक केली आहे. हे सर्व प्रकल्प १०० टक्के पूर्ण करून पुढील वर्षी ५ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा नवा संकल्प आपण पूर्ण करू."

**■ 'मिलाप' ॲप आणि 'मैत्री' पोर्टलद्वारे पारदर्शक सेवा**

उद्योगांसाठी एमआयडीसीची जागा मिळवण्यासाठी 'मिलाप' (Milap) ॲप सुरू करण्यात आले असून सोमवारी वैध अर्ज केल्यास पुढच्या सोमवारी घरबसल्या थेट ऑफर लेटर मिळेल. तसेच 'मैत्री' (Maitri) पोर्टलवर अर्ज केल्यास ३० दिवसांत दाखला मिळणे बंधनकारक असून, उशीर झाल्यास अधिकार आयुक्तांकडे जाऊन पुढील ८ दिवसांत मंजुरी दिली जाते.

# 'बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास' विषयावरील कार्यशाळेचे मुख्य सचिव राजेशकुमार अग्रवाल यांच्या हस्ते उद्घाटन

## बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांचे समन्वयाने काम, विद्यमान योजनांतील त्रुटी दूर करून प्रभावी अंमलबजावणीवर भर

**पुणे :** बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्ययोजना तयार करण्यासाठी यशदा येथे 'बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास' या विषयावर आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेशकुमार अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, मेघालय राज्याचे प्रधान सचिव संपतकुमार, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले, बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास हा विषय योग्य पद्धतीने हाताळल्यास भविष्यातील अनेक सामाजिक विकासाची उद्दिष्टे साध्य करता येऊ शकतात. त्यामुळे या विषयाकडे केवळ एका विभागाचा विषय म्हणून न पाहता विविध विभागांनी एकत्रितपणे विचार करून कृती करण्याची आवश्यकता आहे.

बालकाच्या आयुष्यातील पहिली हजार दिवस अत्यंत महत्वाची असतात. गर्भधारणेपासून जन्मानंतरच्या पहिल्या दोन वर्षांपर्यंतचा हा कालावधी विशेषतः मेंदूच्या विकासासाठी निर्णायक असतो. या काळात शासन, समाज आणि पालकांकडून होणारे सकारात्मक हस्तक्षेप जितके परिणामकारक असतील, तितका त्याचा लाभ बालकाला पुढील आयुष्यात मिळतो. विकासाच्या योग्य टप्प्यावर आवश्यक बाबी साध्य झाल्या नाहीत, तर त्याचे परिणाम पुढील संपूर्ण आयुष्यावर होऊ शकतात. त्यामुळे बालकाच्या विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच योग्य हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. एकदा बालकाचे वय पुढे गेले की, त्या वयात साध्य करावयाच्या विकासाच्या संधी त्याच स्वरूपात पुन्हा उपलब्ध होत नाहीत, असे डॉ. परदेशी यांनी स्पष्ट केले.



राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाचा संदर्भ देताना ते म्हणाले, महाराष्ट्रात बालकांमधील वाढ खुंटण्याचे प्रमाण कमी करण्याच्या दिशेने चांगली प्रगती झाली आहे. सर्वेक्षणाच्या तिसऱ्या टप्प्यात हे प्रमाण सुमारे ४६ टक्के होते. त्यानंतरच्या काळात त्यात लक्षणीय घट झाली असून अलीकडील सर्वेक्षणानुसार हे प्रमाण सुमारे २९.५ टक्क्यांपर्यंत आले आहे. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे सामाजिक विकासाच्या निर्देशांकांमध्येही राज्याने अधिक वेगाने प्रगती करणे आवश्यक असून, लहान मुलांच्या वयानुसार उंची आणि वाढीमध्ये अपेक्षित सुधारणा करण्यासाठी अधिक प्रभावी प्रयत्नांची गरज आहे.

बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकासाचा परिणाम केवळ बालकाच्या आरोग्यापुरता मर्यादित नसून त्याचा थेट संबंध पोषण, पूर्वप्राथमिक शिक्षण, शालेय कामगिरी, भविष्यातील उत्पादकता आणि मानवी भांडवल निर्मितीशी आहे. बालकाला योग्य पोषण मिळाल्यास आरोग्य चांगले राहते; चांगल्या आरोग्यामुळे शाळेतील उपस्थिती आणि शिकण्याची क्षमता सुधारते. शालेय कामगिरी चांगली झाल्यास भविष्यातील उत्पादकता वाढते आणि त्यातून चांगले जीवनमान साध्य होण्यास मदत होते. त्यामुळे प्रारंभिक बालविकासासाठी केलेले प्रयत्न हे भविष्यातील सक्षम समाज आणि सक्षम मनुष्यबळ निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरतात, असे डॉ. परदेशी यांनी सांगितले.

प्रारंभिक बालविकासाचा संबंध शाश्वत विकास उद्दिष्टांमधील अनेक उद्दिष्टांशी संबंधित आहे.

### कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून औषध संशोधनाला नवी दिशा

# रसायन तंत्रज्ञान संस्था मुंबईत 'रसायन AI'चा अधिकृत शुभारंभ

**मुंबई :** रसायन तंत्रज्ञान संस्था (ICT), मुंबई येथे १ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत K. V. सभागृहात 'रसायन AI'चा अधिकृत शुभारंभ आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम रसायन AI (Rasayan AI) या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित व्यासपीठाच्या माध्यमातून औषध संशोधन आणि वैज्ञानिक संशोधनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर कसा करता येऊ शकतो, याचा परिचय करून देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास संशोधक, प्राध्यापक, पीएच. डी. व पदव्युत्तर विद्यार्थी, औषधनिर्माण क्षेत्रातील वैज्ञानिक तसेच उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत.

रसायन AI, हे रसायन लॅब्स (Rasayan Labs) यांनी विकसित केलेले व्यासपीठ असून, औषधनिर्माण संशोधन व विकासासाठी एकात्मिक कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली म्हणून त्याची मांडणी करण्यात आली आहे. या व्यासपीठामध्ये रासायनिक माहितीचे विश्लेषण, रेणूंचे विश्लेषण, रासायनिक संश्लेषणाचे नियोजन तसेच विविध भविष्यवाणीक्षम साधनांचा समावेश आहे. वैज्ञानिक माहिती आणि रेणूविषयक संकल्पनांपासून पुढील संशोधनासाठी उपयुक्त निर्णय घेण्यापर्यंतची प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान करण्याचे उद्दिष्ट या व्यासपीठाचे आहे.

**प्रमुख मान्यवर**

या कार्यक्रमात शैक्षणिक, औद्योगिक आणि वैज्ञानिक क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शक म्हणून सहभागी होणार आहेत.

डॉ. अनिरुद्ध पंडित - कुलगुरू, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई, डॉ. प्रशांत खरकर - प्राध्यापक, ICT मुंबई, परमी शाह - मुख्य कार्यकारी अधिकारी, रसायन लॅब्स, डॉ. मनोज खारकर - रिलायन्स इंडस्ट्रीजचे माजी संशोधन व विकास विभागाचे उपाध्यक्ष, डॉ. विकास दांडेकर - संपादक, द इकॉनॉमिक टाइम्स

औषधनिर्माण संशोधन व विकासाच्या क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर दिवसेंदिवस वाढत असताना, कृत्रिम बुद्धिमत्ता, रासायनिक माहितीविज्ञान आणि वैज्ञानिक माहिती यांचा समन्वय साधून औषध शोधण्याची प्रक्रिया अधिक जलद आणि परिणामकारक कशी करता येईल, याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी या कार्यक्रमातून संशोधक व उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांना मिळणार आहे.

**कार्यक्रमाची माहिती**

**दिनांक :** १ सप्टेंबर २०२६, **वेळ :** सायंकाळी ४:०० ते ६:००, **स्थळ :** K. V. सभागृह, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (ICT), मुंबई, **प्रवेश :** विनामूल्य; आसनसंख्या १२० पर्यंत मर्यादित, **आयोजक :** VBP रिसर्च ग्रुप, PSK लॅब्स आणि ICT मुंबई.

हा कार्यक्रम संशोधक, प्राध्यापक, पीएच.डी. व पदव्युत्तर विद्यार्थी, औषधनिर्माण क्षेत्रातील वैज्ञानिक तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित औषध संशोधन आणि वैज्ञानिक संशोधनाच्या भविष्यात रस असलेल्या उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी खुला आहे.

# आपत्तीग्रस्त ६९ नागरिकांचा चीनच्या कोदारी इमिग्रेशन केंद्रावरून सीमा ओलांडून नेपाळमध्ये प्रवेश

**आज ३१ ऑगस्ट पर्यंत मुंबईत पोहोचणार**

**मुंबई :** महाराष्ट्रातील ६९ नागरिकांनी काल सायंकाळी उशिरा कोदारी इमिग्रेशन केंद्रावरून चीनची सीमा ओलांडून नेपाळमध्ये प्रवेश केला असून, प्राप्त माहितीनुसार ते उद्या ३१ ऑगस्ट पर्यंत मुंबईत पोहोचणार आहेत. आपत्तीमध्ये अडकलेल्या ४०४ नागरिकांची राज्य आपत्कालीन कार्य केंद्र (एसइओसी) कडे नोंद असून त्यापैकी राज्यातील २६२ पर्यटक नागरिक अजूनही नेपाळ किंवा चीनमध्ये होते. अजून ६९ नागरिकांना सुखरूप परत आणण्यात यश आले असून यापूर्वी १४२ नागरिक परत आले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सक्रिय पाठपुरावा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांचे अचूक मार्गदर्शन यामुळे एस इ ओ सी द्वारे सुविधा व मदत याद्वारे नियोजनबद्ध प्रयत्न केले जात आहेत. महाराष्ट्रातील नागरिक व पर्यटनासाठी गेलेले पर्यटक यांच्या मदतीसाठी राज्य आपत्कालीन कार्य केंद्र (एसइओसी) द्वारे कार्यवाही करण्यात येत आहे.

नेपाळ येथील महापुराच्या आपत्तीमुळे अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांसाठी काम करताना राज्य आपत्कालीन कार्य केंद्र द्वारे परराष्ट्र व्यवहार मंत्रालय (एम ई ए) नियंत्रण कक्षाशी समन्वय साधून राज्यातील चीन, तिबेट व नेपाळ च्या आपत्तीग्रस्त भागात गेलेल्या नागरिक पर्यटकांची माहिती पाठवण्यात येते. या आधारे पूरग्रस्त विविध ठिकाणी आवश्यक बचाव पथके तैनात करून व्यक्तींचा शोध सुरू आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल आणि संचालक भालचंद्र चव्हाण कार्यवाहीवर सतत लक्ष ठेवून आहेत.

जिल्ह्य यंत्रणांच्या माध्यमातून अडकलेल्या नागरिकांच्या माहितीची निरंतर पडताळणी. ट्रॅव्हल एजन्सी आणि संबंधित कुटुंबांशी सतत समन्वय, हेल्पलाइनद्वारे प्रतिसाद देणारी यंत्रणा. एकात्मिक नियंत्रण कक्ष (Integrated Control Room) - आपत्कालीन प्रतिसाद नियंत्रण कक्ष (नवी दिल्ली), एम ई ए नियंत्रण कक्ष आणि महाराष्ट्र सदन (नवी दिल्ली) यांना अद्ययावत माहिती पुरवणे.

मुद्रक, प्रकाशक **श्री. तुषार श्रीराम खानविलकर** यांनी मालक **सौ. मनाली तुषार खानविलकर** यांच्या करीता हे दैनिक सिद्धकला प्रिंट मीडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू-२३०, टीसीसी इंडस्ट्रीयल एरीया, खैरणे,नवी मुंबई, जि. ठाणे पिन कोड.- ४००७१०, महाराष्ट्र, येथे छापून ए२-१४०३, १४ वा मजला, नं. १, म्हाडा बिल्डिंग ज्युबली मिल ठोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई, पिन कोड - ४०० ०१५, महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले. ■ **संपादक : रामचंद्र पुरूषोत्तम खडपे** ■ **कार्यकारी संपादक : शीतल हरीष करदेकर** ■ **सहसंपादक : सुहास रामचंद्र कांबळे** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांची राहिल). भ्रमणध्वनी - ८८७९९६७७७०. Email : siddhakalaprint13@gmail.com, globaltimes013@gmail.com. **Register No. : RNI-MAHMAR/2012/44621**